दैनिक

# सिंधुदुर्ग समाचार

ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई

www. sindhudurgsamachar. in

T-2/RNP/SDG-06/2021-2023

संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● मंगळवार दि.१२ मार्च २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक १३१ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

## कोकण किनारपट्टी 'सिडको'ला आंदण; सागरी किनारी असलेली होम स्टे योजना बंद होणार

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

नवी मुंबईतील पाणथळी, खाडीकिनाऱ्या-नजीकच्या जमिनी बांधकाम व्यावसायिकांना बहाल केल्याबद्दल टीकेचा धनी ठरलेल्या सिडकोकडे आता संपूर्ण कोकण किनारपट्टीचा ताबा येणार आहे. पालघर, रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यांतील ७२० किलो मीटरच्या कोकण किनारपट्टीवरील १६३५ गावांच्या नियोजनाचे संपूर्ण अधिकार सिडकोला देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे किनारा नियमन क्षेत्र, कांदळवनांचा विस्तीर्ण पट्टा, अभयारण्य, खार जमिनी, पाणथळींसह पश्चिम घाटातील जैववैविध्याने समृद्ध असलेल्या या संवेदनशील विभागाचा विकास सिडको करणार आहे. राज्य शासनाने सोमवारी या संदर्भातील शासन निर्णय जाहीर करताना या कामसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची संस्था नेमण्याचा निर्णयही घेतला. तसेच या भागातील नगरनियोजनाची जबाबदारी पाहणाऱ्या नगररचना विभागाच्या अधिकारांना कात्री लावण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कोकणातील नागरिकांच्या हरकती, सूचना न मागवताच एका विशेष अधिकारान्वये राज्य सरकारने हा निर्णय घेतला.

७२० किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेल्या कोकण प्रदेशाला वैविध्यपूर्ण नैसर्गिक वरदान लाभले आहे. अनेक पर्यटन स्थळे या भागात आहेत. असे असले तरी हा संपूर्ण पट्टा पर्यावरणदृष्टय़ा अतिशय संवेदनशील मानला जातो. अरबी समुद्र, खाडीकिनारे, नदी किनारे यांमुळे पर्यावरणाचे कठोर नियम या भागासाठी लागू आहेत. किनारपट्टी अधिनियम क्षेत्र, केंद्रीय पर्यावरण विभाग तसेच पश्चिम घाटाच्या पर्यावरणदृष्टय़ा संवेदनशील क्षेत्रामुळे या भागाचे एकत्रित नियोजन करणे आव्हानात्मक आहे. संपादित जमिनींवर नवी नगरे उभारणे इतकाच अनुभव असणाऱ्या सिडकोला गुंतागुंतीच्या कोकण किनारपट्टीच्या नियोजनाचे आव्हान पेलावे लागणार आहे.

शासनाकडून सिडको स्थापन करण्यासाठी काढलेला शासन निर्णय हा सिंधुदुर्गासह रत्नागिरी, पालघर रायगड आदी जिल्ह्यांतील गावांच्या विकासाला खीळ घालणार, तसेच स्थानिकांना उध्वस्त करणारा आहे. असा आरोप आज येथे आयोजित पत्रकार परिषदेत शिवसेना खासदार विनायक राऊत यांनी केला. दरम्यान गावातील जमिनी प्राधिकरणाच्या नावावर परप्रांतीयांना देण्याचा शासनाचा डाव आहे, त्यामुळे हा शासन निर्णय रद्द व्हावा यासाठी ठाकरे शिवसेनेच्या वतीने आंदोलन छेडण्यात येणार आहे असेही ते म्हणाले. सिंधुदुर्गनगरी येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार वैभव नाईक, जिल्हाप्रमुख संजय पडते, सतीश सावंत, सुशांत नाईक, संदीप सरवणकर, अतुल रावराणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

४ मार्च ला महाराष्ट्र शासनाने पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग मधील काही क्षेत्रांचा विकास करण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण स्थापन करणारा शासन निर्णय काढला आहे. मात्र हा शासन निर्णय सर्वसामान्य जनतेसाठी नसून सर्वसामान्य जनतेला त्रासदायक ठरणारा, त्यांचे हक्क हिरावून घेणारा आहे. हे प्राधिकरण स्थापन झाल्यास चार जिल्ह्यातील १६३६ गावांमधील ६ लाख ४० हजार ७८३ हेक्टर जमीन या प्राधिकरणाच्या ताब्यात जाणार आहे. त्यावर प्राधिकरणाच्या नियंत्रण असणार आहे. तसेच या गावात कोणतेही बांधकाम असो किंवा अन्य कामाच्या परवानग्या या प्राधिकरण कडून घ्यावा लागणार आहेत. मात्र त्या मिळताना कठीण आहे. शिवाय सागरी किनारी असलेल्या होम स्टे योजना बंद होणार आहे. याशिवाय अनेक दुष्परिणाम जिल्ह्यातील नागरिकांना सहन करावा लागणार आहे. मात्र असे

**पान ३ वर...**

## प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर लक्षवेधी आंदोलन



**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षकांच्या विविध समस्या आणि मागण्यांबाबत लक्ष वेधण्यासाठी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, सिंधुदुर्गच्या वतीने आज जिल्हा परिषदे समोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी लक्षवेधी घोषणा देत आपल्या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. सिंधुदुर्ग जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या गेली अनेक वर्षापासून विविध मागण्या प्रलंबित आहेत. याबाबत अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ सिंधुदुर्ग च्या वतीने शासनाचे व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनेक पत्रव्यवहार केले, मात्र अद्यापही शिक्षकांच्या प्रश्ना बाबत योग्य निर्णय झालेला नाही. यासाठी आज पुन्हा एकदा अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ सिंधुदुर्ग वतीने जिल्हाध्यक्ष राजाराम कविटकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेसमोर आज दुपारी ३ वाजल्यापासून लक्षवेधी धरणे आंदोलन छेडण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजाराम कविटकर, जिल्हा सरचिटणीस बाबाजी झेंडे, कार्याध्यक्ष मधुसूदन घोडे, कोषाध्यक्ष पूनम पालव, राज्य संयुक्त चिटणीस

**पान ३ वर...**

## थोडक्यात



### वायंगणी समुद्रकिनाऱ्यावर २०१ कासवाच्या पिल्लांना जीवदान

**वेंगुर्ले । वार्ताहर**


वायंगणी समुद्रकिनाऱ्यावर घरट्या मधून बाहेर आलेल्या २०१ दुर्मिळ ऑलिव्ह रिडले समुद्री कासवाच्या पिल्लांना आज सुरक्षित रित्या समुद्राच्या पाण्यात नैसर्गिक अधिवासात सोडून जीवदान देण्यात आले. वायंगणी समुद्रकिनाऱ्यावर सांगलीचे जिल्हाधिकारी, वनविभागाचे आर.एफ.ओ संदीप कुंभार, वनरक्षक सावळा कांबळे, सूर्यकांत सावंत, खर्डेकर महाविद्यालयाचे प्रा.व्ही.पी. नंदगिरीकर, रवी शिरसाट कुटुंबीय, श्री. धुरी, कासवमित्र संतोष साळगावकर, सुहास तोरसकर, सुरज तोरसकर, घनश्याम तोरसकर तसेच संकल्प, भालचंद्र, संजय, राहुल मांजरेकर, पर्यटक आणि ग्राम स्थांच्या उपस्थितीत या पिलांना समुद्राच्या पाण्यात सोडण्याचा हा कार्यक्रम करण्यात आला. किनाऱ्यावरील वाळूमध्ये छोट्याशा पावलांनी हळूहळू पुढे पुढे सरकणारी आणि समुद्राच्या पाण्यावर तरंगत पुढे जाणारी ही कासवाची लहान लहान पिल्ले पर्यटकांनी आपल्या कॅमेऱ्यामध्ये कैद केली.



### कणकवलीत दोघांना अनोळखी व्यक्तींनी केली मारहाण

**कणकवली । प्रतिनिधी**

शहरातील बांधकरवाडी श्रीराम नगर येथे रहिवाशी असलेल्या चेतन पवार (वय २५) व येथेच भाड्याने राहणाऱ्या सुनील चव्हाण याला अन्य तालुक्यातून काही इसमाने येत तीन गाड्या घेऊन येत दांड्याने व दगडाने मारहाण केली. यामध्ये त्या चेतन पवार याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्याला ७ टाके पडले. आणि सुनील चव्हाण यांना किरकोळ मार लागला. ही घटना रविवारी रात्री आठच्या सुमारास जुना नरडवे रोड येथील दत्तकृपा निवारा शेड जवळ घडली. त्या ठिकाणी दुचाकी देखील होती त्याचे नुकसान त्या सात ते आठ जणांनी केले आहे.



### टस्करांची पुन्हा दहशत

टस्करासहीत पिल्लूचे सिंधुदुर्गातील दोडामार्ग तालुक्यातील केर येथे डेरेदाखल झाले आहे. रविवारी सायंकाळी हे दोन्ही हत्ती थेट गावात आले अन् माड उध्वस्त केला. ऐन काजू हंगामात हत्ती पुन्हा दाखल झाल्याने शेतकरी धास्तावला आहे. घाटीवडे, बांबर्डे परिसरात तीन महिना पूर्वी टस्कर व पिल्लू दाखल झाले होते. त्यांनी जवळपास दोन महिने तिलारी खोऱ्यात उच्छाद मांडला होता.

## आडवली येथे लागलेल्या आगीत इमारती लाकूड जळून नुकसान




**आचरा । वार्ताहर**

सोमवारी दुपारी आडवली माळरानावर लागलेल्या आगीत घाडीवाडी येथील संजय पटेल यांच्या सॉ मिलच्या आवारातील चिरकामाचे लाखों रुपये किंमतीचे लाकूड जळून नुकसान झाले.आगीची तिव्रता ऐवढी होती की आग विझविण्यासाठी ग्रामस्थांसोबत कणकवली वरून अग्नीशामक बंब पाचारण करण्यात आले होते. सोमवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास आडवली माळरानावर लागलेल्या आगीचा फटका पटेल सॉ मिलच्या आवारातील लाकडांना बसून लाकडांनी पेट घेतला. ही माहिती कामगारां करवी समजताच आडवली ग्रामस्थ विनोद साटम,कृष्णा हर्णे, आबू कदम, अमोल कदम,

**पान ३ वर...**

## आजपासून काम सुरु करण्याच्या आश्वासना अंती निगुडे ग्रामस्थांचे उपोषण मागे

**ओरोस । प्रतिनिधी**

निगुडे देवळीवाडी विहिरीपर्यंत रस्ता मजबुतीकरण काम मंजुर असतांनाही ठेकेराकडून काम सुरु केले जात नसल्याने निगुडे ग्रामस्थांनी येथील पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण केले. सदरचे काम करतांना कोणताही अनुचित प्रकार होऊ नये याकरिता पोलिस बंदोबस्त देण्यात यावा असे पत्र गटविकास अधिकारी वासुदेव नाईक यांनी बांदा पोलिसांना दिल्यानंतर आणि उद्यापासून काम सुरु करण्याच्या आश्वासनाअंती हे उपोषण मागे घेण्यात आले. जिल्हा वार्षिक योजना सन




२२/२३ जनसुविधा अंतर्गत निगुडे देऊळवाडी येथे रस्त्याचे काम मंजूर आहे. मात्र हा रस्ता करण्यात आडकाठी आणण्यात येत होती. त्यामुळे रस्त्याचे काम ठेकेदाराकडून अद्याप पर्यंत चालू करण्यात आलेले नाही. सदर रस्ता वाहतुकीस पूर्णपणे अयोग्य आहे त्यामुळे वाडीतील गरोदर महिला, वयोवृद्ध नागरीक, शाळकरी मुले, यांना रस्त्यावरून प्रवास करत असताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सदरचा निधी खर्च करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२४ पर्यंत असून मुदतीत निधी खर्च न झाल्यास तो निधी परतून

**पान ३ वर...**

## दारू वाहतूक केल्याप्रकरणी सावंतवाडी येथील एक ताब्यात

**बांदा । वार्ताहर**

बेकायदा गोवा बनावटीची दारू वाहतूक केल्याप्रकरणी इन्सुली राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने सावंतवाडी येथील एकाला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून २ लाख ५३ हजाराच्या दारूसह दीड लाखाची गाडी असा एकूण ४ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई जुना पत्रादेवी-बांदा रोड, पोस्ट ऑफिसजवळ येथे करण्यात आली. महेश कृष्णा दाभोलकर (रा. सावंतवाडी) असे संशयताचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार राज्य उत्पादन शुल्क, तपासणी नाका इन्सुली या पथकाने जुना पत्रादेवी-बांदा रोड, बांदा पोस्ट ऑफिसजवळ येथे सिलव्हर

**पान ३ वर...**



## हजारोंचे प्राण वाचविणारा ३१ वर्षे उपेक्षित, निवृत्त मेजरची सरकारकडं आर्तहाक

**मुंबई । प्रतिनिधी**

१२ मार्च १९९३ ला झालेल्या बॉम्बस्फोटानं संपूर्ण मुंबई हादरली. त्यापाठोपाठ १४ मार्च रोजी दादर नायगाव येथील १२ किलो वजनाचा आरडीएक्स, तसंच स्कूटरमध्ये ठेवलेला टाईमबॉम्ब निकामी करून शेकडो जणांचे प्राण वाचविणारे निवृत्त मेजर वसंत जाधव आजही पुरस्कारापासून वंचित आहेत. मुंबईत १९९३ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात




दादरचा बॉम्ब निकामी करणारे निवृत्त मेजर वसंत जाधव अद्यापही केंद्र आणि राज्य सरकारपासून दुर्लक्षित आहेत. त्यावेळी स्कूटरमध्ये ठेवलेला १२ किलो आरडीएक्सचा

**पान ३ वर...**

## मळगांव येथे लागती काजू कलमे जळून खाक

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गाच्या झाराप पत्रादेवी बायपासलगत मळगाव व वेत्ये गावाच्या सीमेवर मळगांव रस्तावाडी येथील काजू बागायतीत सोमवारी मोठी आग लागली आहे. सायंकाळी ४ च्या सुमारास लागलेल्या या आगीत लागती काजू बागायतींसह इतर अनेक झाडे आगीच्या भक्षस्थानी सापडली. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी



चिंताग्रस्त झाले आहेत. सोमवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास महामार्गालगत असलेल्या चॉकलेट फॅक्टरी च्या मागील बाजूस काजू बागायतीत आग लागल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर याबाबतची माहिती स्थानिक शेतकऱ्यांनी माजी सभापती राजू परब यांना दिली. त्यांनी नगरपालिकेत संपर्क साधत अग्निशमन बंब पाचारण केला.

या बंबाच्या सहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, वाळलेले गवत मोठ्या प्रमाणात असल्याने

**पान ३ वर...**

## महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे एसटी प्रवाशांचे हाल

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महा मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम जोरदार सुरू आहे. कामामुळे अनेक ठिकाणच्या निवारा शेड जमीनदोस्त झाल्या आहेत. त्यामुळे एसटीच्या प्रवाशांचे हाल होत आहेत. चौपदरीकरणाचे कामे पूर्ण होण्यासाठी अजून काही महिने लागतील, परंतु तोपर्यंत राष्ट्रीय महामार्गावरील बहुतेक सर्व ठिकाणच्या प्रवासी मार्गनिवारे काढून टाकले गेल्याने



प्रामुख्याने शालेय विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत एसटीच्या सर्वच प्रवाशांना खूप त्रास होत आहे. अशीच परिस्थिती रत्नागिरी नागपूर महा मार्गावरही आहे. पाली ते साखरपा

**पान ३ वर...**

## उभादांडा सागरी किनारी साकारले भारतातील पहिले कवितांचे गाव

**वेंगुर्ले । सुरेश कौलगेकर**

वेंगुर्ल्याचा पाऊस.. कसा माया
करत यायचा.. सरीने त्यात लाड
करत जायचा....
सांग सांग भोलानाथ पाऊस
पडेल का...
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम
असतं...
माझे जीवन गाणे...

या कविता आहेत कवी मंगेश पाडगावकर यांच्या अशा अनेक कवितां साहित्य रसिकांच्या हृदयात जिवंत आहेत आणि माणसाला ऊर्जा देत आहेत अशा कविवर्य मंगेश पाडगावकर व अन्य साहित्यिकांच्या ७०० पेक्षा जास्त साहित्यासह भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव वेंगुर्ले उभादांडा येथे कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या जन्मदिनी साकारलय. शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांच्या संकल्पनेतून हे भारतातील पहिले पुस्तकांचे गाव ही संकल्पना सत्यात उतरली आहे या दालनामुळे निश्चितच साहित्य रसिकांना वेगळी भेट मिळाली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता तीनही बाजूने उंच डोंगर सह्याद्रीच्या कुशीतील हा जिल्हा एका बाजूला विस्तीर्ण समुद्र त्यामुळे या जिल्ह्याला पर्यटकांची ओढ असते वेंगुर्ले तालुका हा निसर्गरम्य पांढरीशुभ्र वाळू नारळ पोफळीच्या बागा आंबा काजू फणस असा निसर्ग संपन्नतेने भरलेल्या या तालुक्याला निसर्गाची संपन्नता त्याचबरोबर साहित्यिकांची खाण दिलेली आहे यामध्ये वि स खांडेकर, मधुसूदन कालेलकर चितांमणी खानोलकर, कृष्णाजी केळुसकर मंगेश पाडगावकर यासह लिटिल मास्टर सुनील गावस्कर, कृषिरत्न काकासाहेब चमणकर अशी अनेक नर रत्ने त्यातीलच एक नररत्न म्हणजे पद्मश्री महाराष्ट्र भूषण कविवर्य के मंगेश पाडगावकर होत. उभादांडा येथे त्यांचे आजोळ होते तेथेच त्यांचा जन्म झाला. उभादाडा येथील वेंगुर्ले शाळा नंबर २ येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले ज्यावेळी वयाच्या ८० व्या वर्षी ते पुन्हा वेंगुर्लेत आले त्यावेळी त्यांनी शाळेतील शालेय जीवनातील गमतीदार किस्से व आपला खोडकर स्वभाव बोलून दाखवल होता. शालेय दप्तरात ते शाळेत शिकलेल्या च्या नोंदी आजही उपलब्ध आहेत. आपल्या शाळेला भेट देतानाच त्यांनी अनेक आठवणी मुलांसमोर मांडताना आपला जीवन उलगडला होता माझे जीवन गाणे हा अजरामर असणारा कार्यक्रम वेंगुर्ले येथे सादर झाला होता आज जरी ते आपल्यात नसले तरी शालेय व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी पहिले पुस्तकांचे गाव त्यांच्याच जन्म गावी सुरू केले हे भारतातील पहिले पुस्तकांचे गाव ठरले आहे. रेडी रेवस सागरी

**पान ३ वर...**




दैनिक सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg. samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com

सिंधुदुर्ग समाचार
।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

# एसबीआयचा सरकारला संरक्षण देण्याचा हेतू !

सर्वोच्च न्यायालयात एसबीआयने मुदत वाढवण्यासाठी ३० जूनपर्यंत कृपया तपशील प्रदान करण्यास आम्हाला वेळ द्या अशी याचिका दाखल केली होती. काल सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली.भाजपाकडून हरीश साळवे हे निवडणूक रोखेंच्या व्यवहाराची रणनीती कशी वापरायची यासाठी तीन आठवडे पुढे ढकलण्याचा निष्फळ प्रयत्न करतान दिसत होते. निवडणूक रोख्यांचा तपशील जाहीर करण्यासाठी मुदतवाढ देण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट शब्दांत नकार दिला. आज, १२ मार्च रोजी कामकाजाची वेळ समाप्त होण्यापूर्वी सर्व माहिती निवडणूक आयोगाकडे सादर करण्याचे आदेश सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या घटनापीठाने दिले आहेत. त्याचवेळी निवडणूक आयोगाने १५ मार्च रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत आपल्या संकेतस्थळावर ही माहिती जाहीर करावी, असे आदेशही न्यायालयाने दिले.

स्टेट बँक ऑफ इंडियाने १२ मार्च रोजी कामकाज बंद होईपर्यंत इलेक्टोरल बाँडची माहिती दिली नाही अथवा निवडणूक आयोगाकडे माहिती सादर न केल्यास बँकेवर अवमानाची कारवाई करण्यात येईल. सर्वोच्च न्यायालयाने असा कडक इशारा सेंट बँक ऑफ इंडियाची अपील याचिका फेटाळताना दिला आहे. रोखे व्यवहारात गुंतलेल्या लोकांची नावे लपवण्याचा, त्या कंपन्यांची नावे लपवण्याचा आणि त्या शेल कंपन्यांची नावे लपवण्याचा, हा एक शेवटचा डावही आता हाताबाहेर गेला आहे. त्या कंपन्यांची नावे उघड होऊ नयेत, उद्योगपतींचे चेहरे उघड होऊ नयेत, कसा तरी लोकसभा निवडणूकेपर्यंत चंदा घोडाळा पुढे ढकलता यावा, यासाठी खूप प्रयत्न केले गेले. एकदा निवडणूकी मधे ४०० जागां मिळाल्या की कोणी देणगी दिली आणि देणग्यांचा व्यवसाय कोणी केला याची कुणाला चौकशी करणे गरजेचे उरणार नाही असा भाजपाचा डाव होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे १०७ अब्ज रुपयांच्या घोटाळ्यातील लोकांचा पर्दाफाश झाला आहे. फक्त या घोटाळ्यातील सामिल लोकांचे नाव आणि चेहरा समोर यायचा बाकी आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया १३६ दिवसांची वेळ मागत होती, तिला ३ आठवड्यांचा वेळ मिळालाही होता, पण आता सर्वोच्च न्यायालयाने सर्व माहिती एका दिवसात द्यावी लागेल असे म्हटले आहे. आता स्टेट बँक ऑफ इंडियाजवळ ५ वाजेपर्यंतचा वेळ उरला आहे जास्तीत जास्त आज संध्याकाळी उशिरा पर्यंतचा कालावधी मिळणार आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाचे दिनेश कुमार खरा हे चेअरमन आहेत, ज्यांना स्टेट बँक ऑफ इंडियाच्या इतिहासात कदाचित पहिल्यांदाच सेवेत मुदतवाढ मिळाली आहे. याआधी त्यांना व्यवस्थापकीय संचालक पदावर दोन वर्षांसाठी सेवेत मुदतवाढ मिळाली होती. एसबीआयच्या याचिकेवर असिस्टंट जनरल मॅनेजरचे नाव का असे मुख्य न्यायमूर्तींनी विचारले असता याला उत्तर देताना वकील हरीश साळवे म्हणाले की, हे त्यांचेच काम आहे, खरेतर न्यायालयाचा आदेश मिळताच स्टेट बँक ऑफ इंडियाचे दिनेश कुमार खरा यांनी नेतृत्वाची धुरा सांभाळायला हवी होती, सगळी माहिती गोळा करावयास हवी होती. हीच ती व्यक्ती आहे जी भारताच्या लोकशाहीच्या भवितव्याशी संबंधित सर्वात मोठी माहितीसाठी देण्यासाठी १६६ दिवसांची मागणी करत होती. ही अशी व्यक्ती आहे जी १.२५ लाखांपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांरी असूनही सर्वोच्च न्यायालयाचे दिलेल्या २१ दिवसात काम पूर्ण करू शकली नाही. दिनेश कुमार खरा यांनी भारतीय लोकांच्या मनात स्टेट बँक ऑफ इंडियाची प्रतिष्ठा खराब केली. त्यांचे नाव इतिहासात योग्यरित्या नोंदवले गेले पाहिजे. याप्रकरणी सरन्यायाधीश डी.वाय.चंद्रचूड, न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती बी.आर.गवई, न्यायमूर्ती जे.बी.पारदिवाला आणि न्या.मनोज मिश्रा या ऐतिहासिक निकाल देणाऱ्या खंडपीठातील सर्व न्यायाधीशांची नावेही इतिहासात नोंदवायला हवी आहेत. आज बँक ऑफ इंडियाने २०० वर्षांची कमाई पणाला लावली आहे.

एसबीआयने बाँडच्या प्रत्येक खरेदीसाठी स्वतंत्र केवायसी करण्यात येते असे कोर्टमधे सोगितले आहे. त्यावर जर केवायसी असेल तर तुम्हाला निश्चितपणे बाँड कोणी खरेदी केले हे माहित आहे असे सरन्यायाधीश डी. वाय.चंद्रचूड यांनी म्हंटले आहे. याचाच अर्थ, अशा प्रकारे स्टेट बँक ऑफ इंडियाने आपली विश्वासार्हता गमावली आहे. इलेक्टोरल बाँडचा निर्णय न्यायालयाने घटनाबाह्य ठरवल्याच्या दिवसापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजपर्यंत या निर्णयाचे स्वागत केलेले नाही.

अयोध्येत २२ जानेवारीला नरेंद्र मोदींनी सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानले. सर्वोच्च न्यायालयाने न्यायाचा सन्मान राखला आहे, असेही ते म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाने आज आपल्या निर्णयाने भारताच्या लोकशाहीचा सन्मान राखला नाही आहे का आणि तो सन्मान जर न्यायालयाने राखला असेल तर न्यायालयाने भारताच्या लोकशाहीचा सन्मान राखला असे पंतप्रधान म्हणू शकतील का? सरन्यायाधीशांनी एसबीआयला स्पष्टपणे सांगितले आहे की, तुमच्याकडेच जे आहे, खरेदीदाराबद्दल माहिती देण्यासाठी ते कोर्टसमोर दाखल करा. हरीश साळवे काही दिवस कसे तरी मिळावेत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत राहिले. आधी ते १३६ दिवस मागत राहिले, नंतर माहिती देण्यासाठी तीन आठवड्यांचा वेळ हवा म्हणाले, स्टेट बँकेच्याच याचिकेत माहिती उपलब्ध असल्याचे पुरेसे नमूद करण्यात आले आहे, त्यामुळे ३० जूनपर्यंत मुदत मागणारा अर्ज रद्द करण्यात आला.

# कोकणातील एक अनोखे म्यूझीयम प्राचीन कोकण

कोकणची संस्कृती नेमकी काय? येथील समाज बांधणी कशी आहे? निसर्गाशी तादात्म्य पावलेला कोकणी माणूस नेमके कोणते आयुष्य जगतो? त्याच्या परंपरा काय आहेत? बदलत्या काळात जीवनशैली वेगाने बदलत असताना आपल्या इतिहासाचा, संस्कृतीचा शोध घेणे कठीण जात आहे. हा शोध सोपा करण्याचे काम वैभव सरदेसाई यांनी 'प्राचीन कोकण' या आगळ्या वेगळ्या संग्रहालयातून चोखपणे केले आहे. गोव्यातील एका प्रदर्शनात परक्या संस्कृतीचे गोडवे गाताना भारतीयत्वाला दिलेला हीन दर्जा त्यांना अस्वस्थ करून गेला. त्या सामाजिक अस्मितेच्या भावनेतून 'प्राचीन कोकण'ची निर्मिती झाली. पूर्णतः व्यावसायिक पायावर उभे असलेले हे कोकणातील पहिलेच प्रदर्शन म्हणावे लागेल. गणपतीपुळे येथे अतिशय मोक्याच्या जागेवर उभ्या असलेल्या या संग्रहालयातून कोकणची संपन्न परंपरा मांडली गेली आहे. इथले समाजजीवन पुतळ्यांच्या रूपाने मांडले जात असतानाच संग्रहालयाच्या रचनेतून कोकणातील भौगोलिकतेचाही आविष्कार त्यात झालेला आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे हे संग्रहालय पाहण्यासाठी तिकीट काढून तुम्ही आत जाता तेव्हा एक 'गाईड' हसतमुखाने स्वागत करत तुमची वाट पाहात असतो. येथे हा गाईड निःशुल्क आणि अनिवार्य असतो.

कुणालाही गाईडशिवाय संग्रहालय पाहण्यास परवानगी नसते. अगदी पहिल्या दिवसापासून ही व्यवस्था ठेवलेली आहे. किंबहुना हा गाईडच या प्रदर्शनाचा प्राण आहे. प्रदर्शनात आपण जे पाहणार आहोत त्याचे विवेचन, कोकणच्या त्या घटकाची माहिती घेतच प्रत्येकाने पुढे जायचे असते. साधारण एक किलोमीटरची वळणावळणाची वाट कोकणवासीयांच्या स्वच्छ सारवलेल्या अंगणातून, पाटाच्या पाण्याचे संगीत ऐकत आगळ्या वेगळ्या शंख प्रदर्शनात पोहोचतो तेव्हा तर कोकणविषयीची आपली कौतुकभावना वेगळ्या उंचीवर पोहोचलेली असते. तेथेच या संग्रहालयाच्या निर्मात्याच्या कष्टाचे सार्थक होते. हे संग्रहालय उभारणाऱ्या निर्मात्याचे नाव आहे वैभव वासुदेव सरदेसाई, १५ डिसेंबर २००४ रोजी हे प्रदर्शन समस्त पर्यटकांच्या सेवेत रुजू झाले. ते अव्याहतपणे सुरू आहे.

वैभव सरदेसाई यांनी सन २००४ च्या शेवटी उभारलेले हे प्रदर्शन वेगवेगळ्या स्थित्यंतरांतून जात आज गणपतीपुळ्याच्या पर्यटनाची आगळी ओळख ठरलेले आहे. १५० हून अधिक प्रकारची विविध झाडे, ४० हून अधिक प्रकारचे येणारे पक्षी, जंगलातून आढळणारे वेगवेगळे प्राणी... संपन्न कोकणाची ही सारी लक्षणे या प्रदर्शनातून प्रकटत असतात. वैभव यांच्या या 'वेडा'ला सातत्याने सहकार्य करणारी त्यांची पत्नी स्वरुपा यांचेही या वाटचालीतील योगदान मोलाचे असते. वैभव यांनी वेगवेगळी धाडसं करायची आणि स्वरुपा यांनी प्रत्येक ठिकाणी त्यांना पूरक ठरणारी भूमिका बजावायची, हा क्रम आता दोघांच्याही अंगवळणी पडला आहे. वास्तविक वैभव मूळ मोर्डे इथले. या प्रदर्शनाच्या निमित्ताने ते गणपतीपुळ्यात स्थिरावले.

जागेचा प्रश्न सुटला तसा पुढील विचार सुरू झाला. त्याला दोन पैलू होते. पहिला पैलू या प्रकल्पाच्या अर्थकारणाचा आणि दुसरा रचनेचा. रचनेच्या बाबतीत वैभव यांचा निर्णय स्वच्छ होता. कोकणातील चढ-उतारांच्या जमिनीवर गावची रचना ज्या प्रकारची असते तशीच रचना त्यांना संग्रहालयातही अपेक्षित होती. ते सांगतात, कोकणात डोंगराच्या पायथ्याला असलेल्या सपाट जागेला 'मळा' म्हणतात. हा सर्वात सुपीक भाग, गावचे खोत, सघन लोक या भागात राहत. त्यानंतर पहिल्या टेकड्यावर ज्याला स्थानिक भाषेत 'डाग' म्हणून ओळखले जाते तेथे बारा बलुतेदारांचे वास्तव्य असे. डोंगरमाथ्याला 'सडा' म्हटले जाते. तेथे विशेषत्वाने धनगर समाजाचे वास्तव्य असते. हीच रचना मला संग्रहालयात अपेक्षित होती. याच रचनेसाठी मला ही जागा आवडलेली होती. ही रचना मनात ठेवून मी विचार करू लागलो.

ही रचना मनात असली तरी त्याच्या अंमलबजावणीसाठी पैसा लागणार होता. तेथे लागणारा पैसा स्वतःजवळ तर नव्हता. त्यामुळे बाहेरून आणलेला पैसा व्याजासह परत देण्याची योजनाही करावी लागणार होती. लागणारी गुंतवणूक, ती परत मिळविण्यासाठीचे धोरण आणि संपूर्ण प्रकल्पाच्या देखभाल व संचालनासाठी लागणारा खर्च हे सारेच आकडे भयंकर होते.

प्रकल्प उभारताना सुद्धा सुमारे ६ महिने वैभव आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा मुक्काम समोरच असलेल्या बापटांच्या घरात होता. त्यांच्या मातोश्रींनी सर्वांना उत्तम सहकार्य केले. सगळ्यांच्या सहकार्यातून हा प्रकल्प सिद्धीस गेला.

दिनांक १५ डिसेंबर २००४ ला उद्घाटन झाले. सगळीकडे बातम्या आल्या. ३१ डिसेंबरपर्यंत सीझन असतो. त्या काळात गणपतीपुळे ओसंडून वाहत असते. तोवर संग्रहालयालाही भरगच्च गर्दी होती. १ ते ३ जानेवारी दरम्यान गर्दी ओसरत गेली आणि ४ जानेवारीला फक्त ४ जण आले... वैभव सरदेसाई हवेतून जमिनीवर आले... गर्दीचे शास्त्र समजावून घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. लक्षात आले की गणपतीपुळ्यात वर्षात साधारण १०० दिवस 'बिझनेस' चालतो आणि उरलेले २६५ दिवस मोकळे असतात. त्यातही शनिवार-रविवारी थोडीफार गर्दी असते. जूनमध्ये पाऊस सुरू झाला की ऑफ सीझन सुरू होतो. तो थेट दिवाळीच्या दरम्यानच पूर्वपदावर येतो. पण असे असले तरी अशा प्रकल्पांचे वर्षभराचे खर्च कायम असतात. वैभव यांच्यासाठी पहिली पाच ते सहा वर्षे कसोटीची होती. पहिल्या वर्षी मनुष्यबळ कमी होते, त्यामुळे कसेबसे तरून जाता आले पण दुसऱ्या वर्षी त्यांना चक्क पत्नीचे दागिने गहाण ठेवून पगार करावे लागले. दर महिन्याच्या पाचव्या दिनांकाला पगार करायचे, हा क्रम त्यांनी एवढ्या वर्षांत कधी चुकू दिला नाही...!

अतिशय चिकाटीने हा विषय पुढे सरकत गेला. त्या विषयी वैभव सांगतात, व्यावसायिक पूर्वानुभव नसल्याने प्रारंभी काही गोष्टी चुकल्या. पण आम्ही यातून येणारा पैसा याच व्यवसायात गुंतवत होतो. पहिल्या वर्षी प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविल्या होत्या. काही वर्षांनी आम्ही सिमेंटमध्ये त्या तयार करून घेतल्या. पण त्या नीट बनल्या नाहीत. आता फायबरच्या मूर्ती आम्ही आणलेल्या आहेत. दरवर्षी या घरांची शाकारणी करावी लागते. रस्ते नव्याने बनवावे लागतात... सतत नवे काहीतरी द्यावे लागले. काही वर्षांपूर्वी आम्ही शंख प्रदर्शन सुरू केले. भारतात सापडणारे सर्व प्रकारचे शंख या प्रदर्शनात आहेत. काही दुर्मिळ शंखही येथे पाहायला मिळतात... आम्हाला सतत नवे काहीतरी करणे भाग असते. तरच लोक इकडे वळतील...

या परिसराला अस्सल देशी स्पर्श असला पाहिजे या बद्दल ते आग्रही आहेत. इथे येणाऱ्या पाहुण्याला तिकीट काढण्याआधी आत काय काय पाहायला मिळणार आहे, याची माहिती दिली जाते. आत प्रवेश करताच पाणी वगैरे विचारले जाते. मग गाईडच्या मदतीने

इथे येणाऱ्या पर्यटकांना आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविणे ही माझी जबाबदारी आहे या भावनेतून प्रत्यक जण कार्यरत असतो. वैभव 'मालक' म्हणून कधीच वावरत नसतात तसेच स्वरुपा यांचा भाव सुद्धा 'मालकीण' असा नसतो. हे सगळे एका समान पातळीवर येथे कष्टत असतात. कुणी येथे न सांगता दांडी मारत नाही. रजेचा अर्ज भरून दिला जातो. आपले पर्यायी काम कोण करू शकेल हे त्यात नमूद केले जाते. रीतसर परवानगी घेऊन लोक रजेवर जातात. गर्दी जास्त असेल तर जेवणाच्या सुटीची आठवणही कुणाला होत नाही... प्रत्येक जण या प्रकल्पात समरस होऊन, समर्पित भावनेने काम करतो. या उपक्रमाची दखल राज्य स्तरावर घेतली गेली. सन २०१२ मध्ये 'आम्ही उद्योगिनी' हा पुरस्कार देऊन स्वरुपा सरदेसाई यांना गौरवण्यात आले,

दरवर्षी नवे काही करायची वैभव सरदेसाई यांची इच्छा असते. त्याच इच्छेतून त्यांनी २०१६ पासून एक वेगळा उपक्रम सुरू केला आहे. हे आहे 'मॅजिक गार्डन.' बाळगोपाळांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचे मनोरंजन करण्याचा हा प्रकल्प चांगली गर्दी खेचतो आहे.

इथले जंगल आता छान विकसित झाले आहे. पाण्याची सोय आहे, त्यामुळे पक्षी मोठ्या संख्येने येतात. १५० हून अधिक प्रकारच्या वनस्पती, ४० हून अधिक प्रकारचे पक्षी आणि वेगवेगळ्या प्रकारचे पशू-प्राणी इथे पाहायला मिळतात. १७० प्रकारच्या शंखांचे प्रदर्शन येथे आहे. गुजरात ते बंगाल या संपूर्ण किनारपट्टीवरील शंख इथे पाहायला मिळतात. या शंखांच्या अनुषंगाने एक गोष्ट... ध्वनीनिर्मितीसाठी जे शंख वापरले जातात ते मोठ्या आकाराचे असतात. ते वापरात आणण्याआधी त्यात असलेला प्राणी मारावा लागतो. तो मारण्याची पारंपरिक पद्धत म्हणजे साधारण ३ महिने तो शंख शेणात कुजवत ठेवला जातो.मग देव पुजेचा शंख तयार होतो.

निरीक्षण : जिद्दीतून खूप काही घडत असते. स्वत्वाची जाणीव करून देणारे जिवंत वाटावे असे संग्रहालय उभारण्याची जिद्द मनाशी बाळगून वैभव सरदेसाई यांनी कंबर कसली. त्यांची पत्नी स्वरुपा यांनी त्यांच्या स्वप्नांना पंख दिले आणि त्याच वेळी प्रत्येक पावलावर साथही दिली. व्यावहारिकतेच्या कसोटीवर कदाचित अपात्र ठरणारा 'प्राचीन कोकण' सारखा प्रकल्प मनस्वीपणातून साकारला गेला. भूतकाळाची, सांस्कृतिक वारशाची यथार्थ जाणीव करून देणाऱ्या या प्रकल्पातून समाजाच्या मनात स्वत्वाचे स्फुल्लिंग चेतविण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच यशस्वी ठरला. व्यावसायिक गणिते जुळविताना होणारी ओढाताण सोडली, तर अशा प्रकारचा प्रकल्प व्यवसाय म्हणूनही यशस्वी होतो, हे त्यांनी दाखवून दिले.

**सिंधुदुर्ग- अभिमन्यू वेंगुर्लेकर**
**(दैनिक सिंधुदुर्ग समाचार)**

# भारतातील घटस्फोटांचे वाढते प्रमाण चिंताजनक !

भारताला लाभलेली प्राचीन हिंदू संस्कृती हे भारताचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. या संस्कृतीचा भाग असलेली विवाहसंस्था जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेही पाहायला मिळत नाही. विवाह पृथ्वीतलावर होत असले, तरी जोडीदाराच्या गाठी या स्वर्गातच बांधल्या जातात अशी समजूत भारतीयांत पूर्वापार चालत आली आहे. त्यामुळे घटस्फोट हा शब्द भारतीय शब्दकोशात कुठेही सापडत नाही. विवाह संस्काराच्या माध्यमातून सात जन्माची गाठ बांधली जाते, या संस्कारात देवाब्राह्मणांच्या साक्षीने जन्मभर एकमेकांशी प्रामाणिक राहण्याचे, एकमेकांची काळजी घेण्याचे वचन दिले आणि घेतले जाते. या पवित्र संस्काराने बद्ध झालेले उभयता आयुष्यात येणाऱ्या सुखदुःखाच्या प्रसंगांना नेटाने सामोरे जातात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना साथ देत संसाराचे गाडे हाकतात. गेल्या काही वर्षांत भारतीय तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. भारतात वाढत जाणारे घटस्फोटांचे प्रमाणही याचीच फलश्रुती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, २०२१ साली देशाच्या कौटुंबिक न्यायालयांत घटस्फोटांचे ५ लाख खटले प्रलंबित होते. २०२३ साली हीच संख्या ८ लाखांपर्यंत पोहोचल्याचे एका अहवालातून समोर आले आहे. घटस्फोटाच्या खटल्यांत वर्षागणिक होत जाणारी वाढ भविष्यांत पश्चिमी देशांना मागे टाकू शकते अशी भीती निर्माण झाली आहे. दरवर्षी घटस्फोटांची जेव्हढी प्रकरणे न्यायालयात निकाली काढली जातात, तेव्हढीच किंबहुना त्याहून अधिक नवीन प्रकरणे न्यायालयांत नव्याने प्रविष्ट केली जातात. त्यामुळे येणाऱ्या काळात देशाची कुटुंबव्यवस्था संकटात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तरुण पत्नी पत्नी विभक्त झाल्याने सर्वाधिक परिणाम त्यांच्या अपत्यांवर होतात. अशा अपत्यांमध्ये एकलकोंडेपणा, द्वेष, चिडचिड करणे, सूडभावनेने वागणे यांसारखे दोष प्रकर्षाने दिसून येतात. घटस्फोटित पालकांची मुले नकळतपणे गुन्हेगारीकडे वळत असल्याचे निरीक्षणही अहवालात नोंदवण्यात आले आहे. पश्चिमी देशांच्या तुलनेने भारतात होणाऱ्या घटस्फोटांची टक्केवारी कमी असली, तरी आज या प्रकारांवर नियंत्रण आणले नाही, तर भविष्यात ती भीषण स्वरूप धारण करू शकते,ज्याचा परिणाम सामाजिक व्यवस्थेवर होऊ शकतो. विवाह करताना प्रत्येक मुलामुलीने आपल्या भावी आयुष्याबद्दल अनेक स्वप्ने रंगवलेली असतात या स्वप्नांचा चुराडा करणारा घटस्फोट कुणालाही नको असतो; मात्र तो आयुष्यात येण्यामागे कारणेही तितकी गंभीर असू शकतात. शहरासारख्या ठिकाणी राहणाऱ्या जोडप्यांमध्ये ग्रामीण



भागाच्या तुलनेत घटस्फोटांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात राहणारे बहुतांश तरुण पती पत्नी दोघेही नोकरी किंवा व्यवसाय करणारे आणि बऱ्यापैकी धन कमावणारे असतात. कार्यालयात उच्च पदावर असताना इतरांकडून मिळणारा मानसन्मान, सुधारित राहणीमान यामुळे राहणीमानाचा आणि पदाचा काही प्रमाणात अहंकार निर्माण होऊ लागतो. घरी जोडीदाराकडूनही अशाच सन्मानाची अपेक्षा केली जाते. तो तितक्या प्रमाणात न मिळाल्यास लहान सहान प्रसंगांतून खटके उडू लागतात. खटक्यांचे रूपांतर वादात होते. कधी कधी हे वाद विकोपाला पोहोचतात. सातत्याने असे प्रसंग घडू लागल्यास जोडीदारासोबत राहणे नकोसे वाटू लागते. माघार घेण्याची सवय नसल्याने वितुष्ट वाढत जाऊन प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचते. नोकरीच्या निमित्ताने कार्यालयातील सहकारी तसेच कार्यालयाशी संबंधित व्यक्ती यांच्याशी सातत्याने संपर्क येत असल्याने काही वेळा पती किंवा पत्नीचे विवाहबाह्य संबंध निर्माण होतात ज्यामुळे जोडीदारांत वाद होऊन नात्यात भेग निर्माण होते. काहीवेळा विवाहाआधी घडलेले प्रसंग, आजार किंवा जीवनातील एखादी गंभीर घटना याविषयी समोरच्यांशी मोकळेपणाने बोलले जात नाही. या गोष्टी विवाहानंतर लक्षात आल्यावर विश्वासघाताची भावना मनात निर्माण होऊन नात्यातील जवळीकता लोप पावू लागते. ज्याचे पर्यावसान पुढे वादांत आणि भांडणांत होऊन प्रकरण न्यायालयापर्यंत जाते. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहांना सरकाकडून प्रोत्साहन आणि संरक्षण दिले जात असले, तरी विवाहानंतर अचानक बदललेले राहणीमान, तेथील चालीरीती, खाण्या पिण्याच्या सवयी यांचा स्वीकार करताना संघर्ष होतो. आंतरधर्मीय विवाह करताना काहीवेळा जोडीदारावर धर्मपरिवर्तन करण्यास सक्ती केली जाते. असे विवाहही फार काळ टिकत नाहीत. याखेरीज पती पत्नींची मानसिक स्थिती, त्यांच्या सवयी, वागण्या बोलण्याच्या पद्धती, परस्परांच्या नातेवाईकांशी असलेली वर्तणूक यासुद्धा काही प्रमाणात घटस्फोटास कारणीभूत ठरू लागल्या आहेत. जोडीदाराला असलेली व्यसने त्याचा मित्रवर्ग यागोष्टीही लग्नाआधी ज्ञात नसल्यास गंभीर वादास कारणीभूत ठरतात. पतिपत्नीचे नाते बहरण्यासाठी एकमेकांना समजून घेणे, एकमेकांना गुणदोषांसह स्वीकारणे, परस्परांशी मनमोकळेपणाने बोलणे, एकमेकांना प्रोत्साहन देणे, आवश्यक तिथे तडजोड करणे, माघार घेणे, परस्परांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणे या गोष्टी प्राथमिक टप्प्यावर अत्यंत आवश्यक असतात. आपला अहंकार जपत राहिल्यास लहान सहान प्रकरणात विनाकारण मनात क्लेश निर्माण होऊन नात्यातील प्रेम लोप पावू लागते. आताच्या पिढीवर अनैतिकता पसरवणारे चित्रपट, कुटुंबव्यवस्थेला छेद देणाऱ्या मालिका, वासनांधतेने भरलेल्या वेब सिरीज यांचा प्रभाव अधिक आहे. विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था यांना तुच्छ लेखनाऱ्या या चित्रपट-मालिकां मध्ये विवाहबाह्य संबंध, गृहकलह, घटस्फोट यांसारखे विषय चवीने चघळले जातात. लिव्ह इन रिलेशिनशिपसारख्या पाश्चिमात्य विकृतीला देशात कायद्याचे संरक्षण असल्याने घटस्फोट घेणे किंवा एक जोडीदार असताना दुसऱ्यासोबत राहणे आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या पिढीला तितकेसे चुकीचेही वाटत नाही. भारतीय कुटुंब व्यवस्था टिकवायची असेल, तर या व्यवस्थेचे लाभ महाविद्यालयीन शिक्षणातून शिकवले जायला हवेत त्यासोबतच चित्रपट, मालिका, वेब सीरिज यांतुन भारतीय संस्कृतीला छेद देणारे प्रसंग, कथानक, संवाद यांवर निर्बंध आणणे आज आवश्यक बनू लागले आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**



# लोकसंख्यावाढीकडे दुर्लक्ष का ?

जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश म्हणून जागतिक पातळीवर भारताची आणखी एक ओळख निर्माण झालेली आहे. देशाच्या एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत ही लोकसंख्या भरमसाठ आहे. वाढती लोकसंख्या ही आजमितीला साऱ्या देशाची डोकेदुखी ठरली आहे. प्रगत वैद्यकशास्त्रामुळे एकीकडे मृत्युदर कमी होत चालला आहे तर दुसरीकडे लोकसंख्येवर शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे मूलभूत गरजांच्या पुरवठ्यावर भार येत चालला आहे. परिणामी बेरोजगारी, उपासमार, निरक्षरता यांमध्ये प्रचंड वाढ होऊ लागली आहे. बेरोजगारीमुळे गुन्हेगारी वाढू लागली आहे. नोकरी व्यवसायाच्या आशेने अधिकाधीक लोक शहराकडे वळू लागल्याने शहरे बकाल होत चालली आहेत. वाढत्या लोकसंख्ये मुळे सरकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यास अडचणी येत आहेत. आजमितीला जगातील सर्वच देश आपल्या लोकसंख्येविषयी जागरूक आहेत. याउलट आर्थिक महासत्ता होऊ पाहणारा आणि लोकसंख्येच्या बाबतीत जगात अग्रणी असलेला भारत देश मात्र काहीच हालचाली करताना दिसत नाही याचे आश्चर्य वाटते. लोकसभा निवडणुकांच्या प्रचारालाही सुरुवात झाली; मात्र लोकसंख्या नियंत्रणाच्या बाबतीत काही उपाययोजना काढण्याचे आश्वासन कोणताच राजकीय पक्ष देताना दिसत नाही. माणसाच्या मूलभूत गरजा जोपर्यंत पूर्ण होत आहेत तो पर्यंत सर्व आलबेल असेल; मात्र वाढती लोकसंख्या कधीना कधी या मूलभूत गरजा पूर्ण करणाऱ्या स्रोतांवर निश्चितच घातक परिणाम करेल त्यावेळी अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. या परिस्थितीला तोंड देण्याची सिद्धता सरकारने केली आहे का ? नैसर्गिक स्रोत आणि साठा यांना मर्यादा असल्याने ते आणखी किती जणांना आणि किती वर्षे पुरणार ? भारतीय लोकसंख्येच्या विस्फोटाविषयी संसदेत अनेकदा केवळ चर्चा झाल्या आहेत; मात्र ठोस उपायोजना अद्याप काहीही काढण्यात आलेल्या नाहीत. यामागे सांप्रदायिक आणि आर्थिक विभिन्नता, विद्यमान कायदे, निरक्षरता अशी अनेक कारणे असतील; मात्र आज ती सोडवून काही ठोस निर्णय घेतले गेले नाहीत तर भविष्यात सरकारला फार मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल हे निश्चित आहे.

**सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग)** : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : ॲड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, येथे छापून प्रकाशन स्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६०02 येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पाटमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगर ए ठाणे (वेस्ट)४००६०४

## पान १ वरून

### कोकण किनारपट्टी 'सिडको'ला आंदण; सागरी किनारी असलेली होम स्टे योजना बंद होणार

असतानाही चारही जिल्ह्याचे पालकमंत्री आणि जिल्ह्यातील शिक्षणमंत्र्यांनी याकडे दुर्लक्ष केला असल्याकडे त्यांनी यावेळी लक्ष वेधले. तसेच हा शासन निर्णय १६३५ गावातील नागरिकांना उध्दवस्त करणारा आहे. प्राधिकरणाच्या नावावर या गावातील जमिनी परप्रांतीयांच्या हाती देण्याचा शासनाचा डाव असल्याचा आरोप खा.विनायक राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत केला. तसेच या शासन निर्णयाविरोधात ऊबाठा शिवसेनेच्या वतीने आंदोलन छेडण्यात येणार असून हा जीआर रद्द करण्यास शासनाला भाग पडणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

### प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर लक्षवेधी आंदोलन

महादेव देसाई, राज्य संघटक प्रशांत पारकर, यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून त्यांनी विविध मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहेत. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा अंतर्गत बदल्या व नवीन शिक्षण सेवक नियुक्ती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करावी, आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना जिल्हा अंतर्गत बदल्यापूर्वी कार्यमुक्त करावे तसेच त्यांच्या रिक्त झालेल्या जागा जिल्हा अंतर्गत बदली व नवीन नवनियुक्त शिक्षण सेवकांसाठी खुल्या कराव्यात, पदवीधर विषय शिक्षकांची निवड प्राधान्याने कार्यरत उपशिक्षकांमधूनच करावी, विस्तार अधिकारी पदोन्नती व पदवीधर पदावनत प्रस्ताव तात्काळ मंजूर करावेत व सदरच्या पदोन्नत्या तात्काळ देण्यात याव्यात, मासिक वेतन दरमहाच्या १ तारखेला बँक खाते जमा करावे., शालेय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करावे, आदी प्रमुख मागण्या या निवेदनातून करण्यात आल्या असून या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आज अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ सिंधुदुर्ग च्या वतीने जिल्हा परिषदेसमोर लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात आले.

### आडवली येथे लागलेल्या आगीत इमारती लाकूड जळून नुकसान

अमोल घाडी, सुशांत साटम,अनिल घाडी अरविंद साटम यांसह अन्य ग्रामस्थांनी धाव घेत आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले.मात्र दुपारची वेळ आणि सुटलेल्या वा-यामुळे आगीने रौद्ररूप धारण केले होते.त्यामुळे आग विझविण्यासाठी कणकवली येथून अग्निशामक बंब बोलावण्यात आले.मात्र आगीच्या रौद्ररूपात लाकूड गिरणीवरील सुमारे अडीच लाखाचे शिवण लाकूड दहा टण,अंदाजीत सहा लाखाचे साधे लाकूड ३०टन जळून पटेल यांचे सुमारे साडे आठ लाखांचे नुकसान झाले.याबाबत सरपंच संदीप आडवलकर,तलाठी लक्ष्मण देसाई, ग्रामविकास अधिकारी युवराज चव्हाण, तंटामुक्ती अध्यक्ष अरविंद साटम यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचा पंचनामा केला आहे.

### आजपासून काम सुरु करण्याच्या आश्वासना अंती निगुडे ग्रामस्थांचे उपोषण मागे

जाण्याची शक्यता आहे. रस्त्याचे काम सुरू करण्याबाबत निगुडे सरपंच यांना अनेकदा विचारले असता त्यांच्याकडून काम सुरू करणेबाबत कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने निगुडे देऊळवाडी ग्रामस्थांनी पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण सुरु केले. या उपोषणाची दखल घेत सायंकाळी उशिरा गटविकास अधिकारी श्री नाईक सदर काम सुरू करण्यासाठी बांदा पोलिसांना पत्र देत पोलीस सुरक्षा पुरवण्याची मागणी केली तसे पत्र उपोषणकर्त्यांना दिले व तात्काळ काम सुरू करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर उपोषणकर्त्यांनी हे उपोषण मागे घेण्यात आले.सदर उपोषणास गुरुदास निगुडकर,माजी सरपंच ग्राम पंचायत सदस्य समीर गावडे, माजी सरपंच शांताराम गावडे, माजी उपसरपंच गुरुदास गवंडे, ग्रामपंचायत सदस्य वर्षा निगुडकर, माजी ग्रामपंचायत सदस्य महेश सावंत, योगेश केणी ग्रामपंचायत सदस्य रोणापाल, हनुमंत सावंत, विनया नाईक, कृष्णा निगुडकर, श्रीराम सावंत, गंधाली निगुडकर, महेश निगुडकर, सिद्धेश निगुडकर, सुभाष निगुडकर, अनंत निगुडकर, शुभांगी निगुडकर, मेघा सावंत, सुहासिनी निगुडकर, शशिकांत निगुडकर, वसंत निगुडकर, शुभांगी निगुडकर, आदिती आरोसकर, पार्वती सावंत, विनायक नाईक, शंकर सावंत, तुळशीदास गवंडे, अंकुश निगुडकर, प्रभाकर सावंत, दीपक निगुडकर, नितीन निगुडकर, महादेव सावंत, देविदास निगुडकर, दिपाली निगुडकर, शिवदास निगुडकर, शुभांगी सुभाष निगुडकर, प्रभाकर सावंत, महादेव सावंत, आदी निगुडे देवळीवाडी ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता.

### दारू वाहतूक केल्याप्रकरणी सावंतवाडी येथील एक ताब्यात

रंगाची मारुती सुझुकी कंपनीची अल्टो चारचाकी वाहनाची तपासणी केली असता यात गोवा बनावटीच्या विदेशी मद्याचे विविध ब्रॅन्डचे ४४ बॉक्स अवैध साठा मिळून आला. या प्रकरणी महेश कृष्णा दाभोलकर याला मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. या गुन्ह्यामध्ये २ लाख ५३ हजाराची दारू व १ लाख ५० हजार किमतीची गाडी असा एकुण ४ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून महाराष्ट्र दारुबंदी कायदा अंतर्गत विविध कलमानुसार गुन्हा नोंदविण्यात आला.₹/हिी कारवाई अधीक्षक मनोज शेवरे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक तानाजी पाटील, प्रदीप रास्कर, गोपाळ राणे, दिपक वायदंडे, प्रसाद माळी, रणजीत शिंदे यांनी केली. ये प्रकरणी पुढील तपास प्रदिप रास्कर करीत आहेत.

### मळगांव येथे लागती काजू कलमे जळून खाक

ही आग आटोक्यात न येता आजूबाजूला पसरत गेली. चार ते पाच किलोमीटर परिसरात पसरलेल्या आगीने अक्षरशः रौद्ररूप धारण केल्यामुळे या वणव्यात काजू आंबा बागायतीसह अन्य वृक्षही जळून खाक झाले. मळगाव सरपंच हनुमंत पेडणेकर तसेच ग्रामपंचायत सदस्यांनीही घटनास्थळी भेट देत पाहणी केली. कुंभार्ली भागाच्या तलाठी भक्ती सावंत यांनीही उपस्थित राहत पाहणी केली. अग्निशमन बंब व स्थानिकांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात होते. सायंकाळी उशिरापर्यंत आगीचे तांडव सुरूच होते. मळगाव येथील दोन पूर्वज मंदिरापासून ते महामार्गापर्यंत ही आग येऊन धडकली होती. स्थानिक शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार या आगीत विलास सहदेव राऊळ, अरुण राऊळ, सुरेश सहदेव राऊळ, सुहास शशिकांत राऊळ यांची कलमी काजू बागायती तर दिलीप राऊळ यांची गावठी व कलमी काजूंची बागायती जळून खाक झाली. तर अन्य चार ते पाच शेतकऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची तलाठी भक्ती सावंत यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. मंगळवरी कृषी सहाय्यकांसोबत नुकसानीचा पंचनामा करण्यात येणार असून त्यानंतरच निश्चित नुकसानीचा अंदाज येईल, अशी माहिती भक्ती सावंत यांनी दिली.

# शांताराम उर्फ बाळा गोसावी यांची भाजपा भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्षपदी अभिनंदनिय निवड

**मसूरे । वार्ताहर**

मसुरे गावचे सुपुत्र समाज सेवक श्री शांताराम उर्फ बाळा गोसावी यांची भाजपा भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्षपदी निवड नुकतीच करण्यात आली आहे. याबाबतचे लेखी पत्र भाजप भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष श्री राहुलजी गोविंदराव केंद्रे यांनी श्री बाळा गोसावी यांना दिले आहे. भारतीय जनता पक्षाचे विचार अगदी तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी या पदाचा विनियोग करावा तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आपल्या भारत देशाची वाटचाल जागतिक महासत्ता होण्याच्या दृष्टिकोनातून सुरू आहे यासाठी त्यांचे हात बळकट करण्यासाठी आपण भारतीय जनता पक्षाचे काम या पुढेही असेच सुरू ठेवावे. असे आवाहन राहुल केंद्रे यांनी श्री बाळा गोसावी यांना दिलेल्या लेखी पत्रात नमूद केले आहे.

श्री शांताराम उर्फ बाळा गोसावी हे मसुरे गावचे सुपुत्र असून अनेक शासकीय योजनांचा तसेच शासकीय कारभाराचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. कैलासवासी नारायण शांताराम गोसावी चारिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांनी सामाजिक, कला, क्रीडा, आरोग्य क्षेत्रात मोठे काम केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात अगदी तळागाळातील लोकांपर्यंत त्यांची नाळ जोडलेली आहे. गेली अनेक वर्षे भारतीय जनता पक्षाच्या भटके विमुक्त आघाडी या सेलच्या मालवण तालुका अध्यक्ष तसेच जिल्हा प्रभारी म्हणून काम करताना त्यांनी या पदाला योग्य तो न्याय दिलेला आहे. संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये त्यांनी या सेलच्या माध्यमातून अनेक लोकांच्या गाठीभेटी



घेऊन विविध विकासात्मक प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या वरिष्ठ पदाधिकारी, आदरणीय भारतीय जनता पक्षाचे सर्व वरिष्ठ नेतेमंडळी यांच्याकडे पाठपुरावा करून अनेक प्रश्न सोडविले आहेत. केंद्रीय मंत्री नारायणराव राणे, सिंधुदुर्गचे पालकमंत्री नामदार रवींद्र चव्हाण, माजी खासदार निलेश राणे, आमदार नितेश राणे, जिल्हाप्रमुख प्रभाकर सावंत, प्रांतिक सदस्य भारतीय जनता पार्टी श्री दत्ता सामंत, भारतीय जनता पक्ष भटके विमुक्त आघाडी सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष नवलराज काळे तसेच भारतीय जनता पक्षाच्या सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांचे आभार श्री बाळा गोसावी यांनी मानले आहेत. याबाबतचे लेखी पत्र श्री राहुलजी केंद्रे यांनी बाळा गोसावी यांना सोमवारी दिले.

यावेळी बोलताना श्री बाळा गोसावी म्हणालेत मिळालेल्या पदाचा उपयोग जनसामान्यांसाठी करून भारतीय जनता पक्षाची तत्वे आणि हा पक्ष तळागाळात रुजवण्यासाठी तन-मन-धन अर्पण करून आपण काम करणार आहोत.येत्या काही काळातच भाजप भटके विमुक्त आघाडीच्या माध्यमातून संपूर्ण राज्यामध्ये भारतीय जनता पक्ष नंबर एकचा पक्ष बनवण्यासाठी आपण सर्व ते योगदान देणार आहे. मला मिळालेले हे पद भारतीय जनता पक्षाच्या तसेच भाजप भटके विमुक्त आघाडीच्या सर्व कार्यकर्ते, सदस्य, पदाधिकारी यांचे असून सर्व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आपण योग्य ते काम करणार आहोत. त्यांच्या या निवडीबद्दल भारतीय जनता पक्षाचे कल्याण डोंबिवली चे युवा भाजपा नेते नंदू दादा परब, माजी जि प अध्यक्ष सरोज परब, जिल्हा उपाध्यक्ष अशोक सावंत, तालुका अध्यक्ष धोंडी चिंदरकर, जिल्हा उपाध्यक्ष विजय केनवडेकर, माजी उपसभापती छोटू ठाकूर, मसुरे माजी सरपंच लक्ष्मी पेडणेकर, महेश बागवे, विलास मेस्त्री, जितेंद्र परब, संतोष पालव, बाबू आंगणे, दीपक पाटकर, नाना सामंत, महेश परब, बाळा सामंत, प्रथमेश निकम, सुधाकर बिरमोळे, नरेश आंगणे, सतीश आंगणे, अशोक बागवे, आणि नारायण शांताराम गोसावी चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व सदस्य, मसुरे ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

## थोडक्यात



### सहवेदना

वेंगुले येथेल रहिवाशी गुरु ठाकुर यांचे सोमवारी राहत्याघरी दुःखद निधन झाले. अण्णा (दादा) ठाकूर यांचे ते चुलतबंधू होय.

### हरिचरणगिरी येथे १२ व १३ मार्चला दशावतार नाट्यप्रयोग

**वेंगुर्ले । प्रतिनिधी**

वेंगुर्ला तालुक्यातील हरिचरणगिरी येथे मंगळवार १२ मार्चला वार्षिक सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन हरिचरणगिरी अंतिम बस स्टॉप येथे करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता श्री सत्यनारायण महापूजा, सायंकाळी ग्रामस्थांची भजने, व सायंकाळी ७ वाजता श्री दत्तमाऊली पारंपारिक दशावतार लोककला नाट्यमंडळ, सिंधुदुर्ग यांचा खाता खाता कोंबडो होता अर्थात कुकुटेश्वर महिमा हा नाट्य प्रयोग होणार आहे. तर बुधवार १३ मार्चला श्री जय हनुमान दशावतार नाट्य मंडळ आरोस दांडेली सावंतवाडी, संचालक शरद मोचेमाडकर यांचा पौराणिक दशावतार नाट्य प्रयोग सादर होणार आहे. या नाट्य प्रयोगास उपस्थित राहण्याचे आवाहन हरिचरणगिरी ग्रामस्थ आणि मित्रमंडळ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### मणेरीतील सभागृहाचे भूमिपूजन

**दोडामार्ग । वार्ताहर**

मणेरी येथील माऊली मंदिरासमोर सभागृह बांधण्यात येणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या प्रयत्नातून १५/२५ योजने मधून या सभामंडपासाठी १० लाख रुपये मंजूर झाले आहेत. त्यासाठी देवस्थानचे मानकरी तथा युवासेनेचे तालुकाध्यक्ष भगवान गवस यांनी प्रयत्न व पाठपुरावा केला. त्यांच्याच हस्ते सभामंडप बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन झाले.

# उभादांडा येथे साकारले भारतातील पहिले कवितेचे गाव

पान १ वरून..

महामार्गावरील ऊभादांडा गाव वेगुर्ला शहराला लागून आहे.अवघ्या चार किलोम ीटरवर हे कविताचे गाव आहे. भारतातील पहिले पुस्तकांचे गाव सागरेश्वर समुद्रकिनारी व सुरुच्या बागेत वसलेले आहे. कविवर्य मंगेश पाडगावकर यांना समुद्राचे भलतेच वेळ होते त्यांनी वेंगुर्ल्यावर असलेले प्रेम हे वेंगुर्लचा पाऊस या कवितेतून साहित्य रसिकांना दाखवून दिले. सुरूच्या झाडाच्या प्रत्येक खोडावर मंगेश पाडगावकर यांची कविता ही जणू प्रत्येक साहित्यिकाला गुणगुणांना लावणारी ठरते त्यांच्या मुख्य दालनात प्रवेश करतात वेंगुर्ल्याचा पाऊस कविता दृष्टिक्षेपास येते. दालनात प्रवेश करतात सुमारे सातशे पुस्तकांचा संच साहित्य प्रेमींना पुस्तकात डोकायायला लावतो जालना समोरून दिसणारा समुद्र पांढरी शुभ्र वाळू प्रत्येक साहित्य प्रेमाला गुणगणायला लावते या दालना भिंतींवर पाडगावकरांच्या अनेक कविता चित्रकाराने रेखाटल्यात यामुळे हे पुस्तकांचे गाव याला निश्चितच भेट देणारे ठिकाण ठरत आहे.

जेव्हा शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री कवी बनतात तेव्हा..

पेला अर्धा भरला आहै असं सुद्धा म्हणता येत...पेला अर्धा सरला आहे असं सुद्धा म्हणता येत....पेला भरला आहे म्हणायचं की सरला आहे म्हणायचं हे तुम्हीच ठरवा... सांगा कसं जगायचं ...कणत कणत की गाणं म्हणत हे तुम्हीच ठरवा... अशी कविता गुणगुणत शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर कवी बनले.

हे बोल आहेत कविवर्य मंगेश पाडगावकर यांचे ज्यांनी पॉझिटिव्ह कसं जगायचं हे जगाला शिकवलं तेच कवी म्हणजे मंगेश पाडगावकर आणि म्हणून भारतातील पहिले पुस्तकाचे गाव हे त्यांच्या जन्म गावी उभादाडा येथे साकारलं जातय असे उदगार शालेय शिक्षण व राज्यभाषा मत्री दीपक केसरकर यांनी काढले.

भारतातील पहिले कवितांचे गाव सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील उभादाडां येथे पद्मभूषण व पद्मश्री जेष्ठ कवी कै. मंगेश पाडगावकर यांच्या जन्मगावी समुद्राच्या सानिध्यात सागरेश्वर या ठिकाणी साकारले आहे.कवितांचे गाव या संकल्पनेत उभादांडा येथे मंगेश पाडगावकर यांच्या साहित्यासमवेत इतर साहित्यीकाचे ७०० पेक्षा जास्त साहित्य उपलब्ध केले आहे. कवितांचे गाव जेथे साकारलय ते समुद्रकिनाऱ्यालगत सुरूच्या वनात आहे.येथे येतानाच झाडांवर कविता लावलेल्या आहेत. त्यामुळे या परिसरात पाडगावकरांचे साहित्य झाडापासून घरापर्यंत रेखाटलेले आहे भारतातील पहिले कवितांचे गाव हे एका खाजगी जागेत सध्या शासनाने उभारलेले आहे. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर हे अर्थमंत्री असताना शासनाच्या बजेट मध्ये तीनवेळा घोषणा केली सद्या जेथे हे दालन उपलब्ध केले आहे त्याच्यात शेजारी महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या जागेत पुस्तकाचे गाव करण्यासाठी अनेक वेळा प्रयत्न झाले मात्र ते अयशस्वी ठरले आज मात्र या सकललप्रणेस मूर्त स्वरूप मिळाले आहे.त्यामुळे एकदा तरी भेट द्या

# हजारोंचे प्राण वाचविणारा ३१ वर्षे उपेक्षित, निवृत्त मेजरची सरकारकडं आर्तहाक

पान १ वरून..

बॉम्ब निकामी करून त्यांनी दादरमधील हजारो जीव वाचवले होते. मात्र, त्यांच्या शिफारशीवरून सहा अधिकाऱ्यांना योग्य तो सन्मान देणाऱ्या सरकारनं त्यांनाच उपेक्षित ठेवलंय. तसंच पत्रव्यवहार करूनदेखील प्रशासन दखल घेत नसल्यानं वसंत जाधव यांनी आता दादर परिसरातच उपोषण करण्याचा मार्ग निवडला आहे.

**३३६ हून अधिक वेळा पत्रव्यवहार :**

निवृत्त मेजर वसंत जाधव यांनी आजपर्यंत राष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्री, नागरी हवाई वाहतूकमंत्री, सार्वजनिक तक्रार निवारणमंत्री आणि डीजी बीसीएएस यांना ३३६ हून अधिक पत्रं लिहून आपल्यावर झालेल्या अन्याय दूर करण्याची विनंती केली. मात्र, अद्यापही यावर त्यांना उत्तर मिळालेलं नाही. याप्रकरणी ईटीव्ही भारतशी संवाद साधत असताना वसंत जाधव यांनी आपली खंत बोलून दाखवली. तसंच ३१ वर्षानंतर ज्या ठिकाणी नायगाव क्रॉस रोड येथे टाईम बॉम्ब निष्क्रिय त्याच ठिकाणी ते येत्या १४ मार्चला उपोषणाला बसणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**अनेकांचे जीव वाचवले :**

वसंत जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, १९९३ मध्ये भारत सरकारच्या ब्युरो ऑफ सिविल एव्हिएशन सिक्युरिटी यांच्या अंतर्गत येणाऱ्या मुंबई विमानतळ येथे सुरक्षेबाबत तसंच बॉम्बस्फोटचा प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्याआधी ते सैन्यात मेजर म्हणून काम करत होते.

### महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे एसटी प्रवाशांचे हाल

पान १ वरून..

दरम्यान अनेक बस थांबे उद्धवस्त झाले आहेत. महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर पूर्वीच्या ठिकाणी मार्गनिवारे उभारले जाणार आहेत. मात्र तोपर्यंत प्रवाशांचे होणारे हाल लक्षात घेऊन महामार्ग विभाग आणि संबंधित ठेकेदारांनी प्रवासी निवारा शेड बांधाव्यात, अशी मागणी होत आहे.

# सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात अखेर सिटीस्कॅन यंत्रणा दाखल

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

येथील उपजिल्हा रुग्णालयात अखेर सिटीस्कॅन मशीन दाखल झाली आहे. येत्या महिनाभरात ती कार्यान्वित होईल. त्यामुळे आता सावंतवाडी मध्ये सिटीस्कॅनची सोय उपलब्ध होणार आहे. याबाबतची माहिती राजू मसुरकर यांनी दिली. आपल्या जीवन रक्षा ट्रस्टच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानंतर पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी ही मशीन उपलब्ध करून दिली असा दावा श्री. मसुरकर यांनी केला आहे. दरम्यान हे कंत्राट एका खाजगी कंपनीला देण्यात आले आहे. त्या कंपनीच्या माध्यमातून गरीब तसेच दारिद्र्य रेषेखालील लोकांना मोफत तर अन्य रुग्णांना नाममात्र शुल्क भरून ही सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे त्यासाठी आवश्यक असलेले तज्ञ डॉक्टर टेली मेडिसिनच्या माध्यमातून या ठिकाणी आपला अभिप्राय देणार आहेत. त्यामुळे अत्यवस्थ



परिस्थिती रुग्णांना तात्काळ सेवा देणे सोयीचे होणार आहे. तसेच अन्य खाजगी रुग्णालयांकडे गेल्याने होणारा आर्थिक भुर्दंड कमी होणार आहे. लवकरच ही सेवा सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाकडून अधिकृत उद्घाटन करण्यात येणार आहे. त्याचा फायदा गोरगरीब रुग्णांना होणार आहे. विशेष म्हणजे सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालय मुंबई-गोवा महामार्गवर असल्यामुळे त्याठिकाणी नियमित अपघातग्रस्त रुग्ण येत असतात. मात्र सिटीस्कॅनची यंत्रणा नसल्यामुळे त्यांना अन्य खाजगी रुग्णालयात पाठवावे लागत होते.

**ग्रामपंचायत कार्यालय ओसरगाव** तालुका- कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग.

जावक क्रमांक ४८४/२०२३-२४ — दिनांक - ०१/०३/२०२४

**कामाची जाहीर निविदा दरपत्रक मागणी नोटीस**

ग्रामपंचायत ओसरगाव ता. कणकवली यांना खालील प्रमाणे नमुद कामांसाठी मोहरबंद निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय तरतुद | निविदा फी |
|---|---|---|---|---|
| १. | प्लॅस्टिक संकलन शेड तयार करणे. | स्वच्छ भारत मिशन व १५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर | ५८३८२/- | १००/- |
| २. | नॅडेप खत खड्डा तयार करणे. | स्वच्छ भारत मिशन व १५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर | ७३९१७/- | १००/- |

वरील कामासाठी कोरे निविदा फॉर्म ग्रा.पं. ओसरगाव यांचेकडे (सुट्टीचे दिवस वगळुन) दि. ०१/०३/२०२४ ते १३/०३/२०२४ रोजी साय ४:०० वा. पर्यंत कोरे निविदा फॉर्म मिळतील.

मोहर बंद निविदा दि. १४/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत ग्रा.पं. ओसरगाव येथे स्विकारण्यात येतील. निविदा मंजूर/नामंजूर/निविदा प्रक्रीया रद्द करणेचा अधिकार खालील सही करणार यांना राखुन ठेवला आहे. वरील प्रमाणे करावयाच्या कामांबाबत / साहित्याबाबत तपशिल, निविदा फॉर्म, निविदे बाबत अधिक माहिती व अटी व शर्ती इ. सर्व माहिती ग्रामपंचायत ओसरगाव यांचेकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**दिनांक :** १/०३/२०२४
**ठिकाण :** ओसरगाव

सही /- सरपंच
ग्रामपंचायत ओसरगांव
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.

**ग्रामपंचात कार्यालय आवळेगांव ओरोसखुर्द** तालुका - कुडाळ, जिल्हा - सिंधुदुर्ग

जा.क्र. २३५/२०२३-२४ — दिनांक ७/०३/२०२६

**जाहीर निविदा**

सरपंच ग्रामपंचायत आवळेगांव ओरोसखुर्द, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. यांचेकडुन खालीलप्रमाणे विकास कामे करावयाची असुन त्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडुन मोहरबंद लखोटयात निविदा मागविण्यात येत असुन, खालील कामे ज्या मक्तेदारांना करावयाची असतील त्यांनी सुट्टीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत व दिनांक - १३/०३/२०२४ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत आवळेगांव ओरोसखुर्द ग्रा.पं. कार्यालयात निविदाचा अर्ज दाखल करावे.

**कामाचा तपशिल**

| अ.क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम रु. | बयाना रक्कम | निविदा उघडणेची तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | आवळेगांव लिंग रवळनाथ रस्ता ते कासारवाडी गोटया सावंत यांच्या घराकडे जाणारा रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. | ३९९८४९/- | ३९९८/- | ग्रामपंचायतच्या सोईनुसार |
| २. | ओरोस खुर्द ते वर्दे मुख्य रस्ता ते श्री.दिनेश जैतापकर यांच्या घराकडे जाणारा रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. | ४९९८७१/- | ४९९८/- | |
| ३. | आवळेगांव नारायण मंदीर ते स्मशानभुमी रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे. | ४९९९६८/- | ४९९९/- | |

सदर कामांच्या अटी व शर्ती ग्रामपंचातय नोटीस बोर्ड व कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध असुन निविदा अर्ज हे ग्रा.पं.कडे रक्कम रु.२००/- फी भरुन उपलब्ध आहेत.

सही /- सरपंच
ग्रामपंचायत आवळेगाव ओरोसखुर्द
ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग

## थोडक्यात



### बिळवसची हर्षिता पालव एनटीएस मध्ये देशात प्रथम

**मसूरे । वार्ताहर**

माध्यमिक विद्यालय बिळवस येथील सहावीची विद्यार्थिनी हर्षिता संतोष पालव हिने नॅशनल टॅलेंट सर्च परीक्षेत ५०० पैकी ४९५ गुण मिळवून देशात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. ५मार्च रोजी सदर परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यापूर्वी एमटीएस परीक्षेत ती राज्यात प्रथम आली होती. देशात प्रथम येत हर्षिता हिने जिल्ह्याचे नाव रोशन केले आहे. हर्षिता ही भाजप शक्ती केंद्र प्रमुख मसुरे जी प मतदार संघ तथा बिळवस ग्रामपंचायत सदस्य संतोष पालव यांची कन्या आहे. देश पातळीवर मिळविलेल्या यशा बद्दल हर्षिता हिचे कौतुक होत आहे.



### वेंगुर्ले शहरातील सर्व दुकानांच्या पाट्या मराठीत करा

**वेंगुर्ले । वार्ताहर**

शहरातील बाजारपेठेत सर्व दुकाने व आस्थापनावर मराठी पाट्या लावण्यात याव्यात, अशी मागणी आज मनसेच्या माध्यमातून मुख्याधिकाऱ्यांकडे करण्यात आली. दरम्यान ८ दिवसात पाट्या बदलल्या गेल्या नाहीत तर मनसे स्टाईल आंदोलन केले जाईल. त्यावेळी होणाऱ्या सर्व प्रकाराला प्रशासन जबाबदार असेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. मनसे जिल्हाध्यक्ष अनिल केसरकर यांच्या नेतृत्वाखाली आज मुख्याधिकाऱ्यांची भेट घेण्यात आली. यावेळी परिवहन जिल्हाध्यक्ष राजू कासकर, उपतालुकाध्यक्ष महादेव तांडेल, शहराध्यक्ष सुरज मालवणकर, सौ.स्नेहा कुडाळकर, सहदेव फोडनाईक, संतोष परब, प्रथमेश नाईक, प्रशांत कुडाळकर, प्रफुल्ल धुरी, विक्रम मोरजकर, प्रतीक गोरे, गौरव मराठे,तेजस वेंगुलेकर, लक्ष्मण दळवी आदी पदाधिकारी आणि सहकारी उपस्थित होते.



### फणसवळे ग्रामपंचायत टिमने केली परुळेबाजर ग्राम पंचायतीच्या उपक्रमांची पाहणी

**वेंगुर्ले । वार्ताहर**

तालुक्यातील परुळेबाजार ग्रामपंचायतीला जिल्हा रत्नागीरी फणसवळे ग्रामपंचायत टिमने अभ्यास दौऱ्याअंतर्गत भेट दिली व विविध उपक्रमांची पाहणी केली. या अभ्यास दौऱ्याअंतर्गत ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायात परुळेबाजार येथे भेट दिली. यावेळी परुळे बाजार ग्राम पंचायत सरपंच प्रणिती आंबडपालकर, उपसरपंच संजय दुधवडकर, माजी सरपंच तथा सदस्य प्रदिप प्रभू, ग्राम सेवक शरद शिंदे, कर्मचारी शंकर घोगळे आदी उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायतीच्या परुळेबाजार अंगणवाडी व्यायामशाळा, काथ्या प्रकल्प, प्लॅस्टीक संकलन व प्रक्रिया युनीट सांडपाणी पुर्नवापर युनिट याची पाहणी केली यावेळी. ग्रा.प- तीच्या कामाचे कौतूक केले. तसेच ग्रामपंचायतने राज्यस्तरीय यश मिळवले आहे त्याबद्दल अभिनंदन केले.

### सावंतवाडीतील धान्य व केरोसीन विक्रेते तीन दिवस संपावर

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

धान्य दुकानदारांच्या विविध मागण्यांसाठी देशव्यापी संघटनाने पुकारलेल्या बंद मध्ये उद्यापासून तीन दिवस सावंतवाडी तालुक्यातील धान्य व केरोसीन दुकानदार सहभाग घेणार आहे त्यामुळे तीन दिवस ही दुकाने बंद राहणार आहेत याबाबतची माहिती सावंतवाडी तालुका धान्य दुकानदार व केरोसीन विक्रेता संघटनेचे अध्यक्ष गणपत राणे यांनी दिली याबाबतचे निवेदन संघटनेच्या वतीने नायब तहसीलदार मनोज मुसळे यांना देण्यात आले.

# विषबाधा होण्यास कारणीभुत ठरणाऱ्या नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांचे तातडीने निलंबन करावे

**ओरोस । प्रतिनिधी**

सांगेली येथील नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्नातून झालेल्या विषबाधा होण्यास कारणीभुत ठरणाऱ्या विद्यालयाच्या प्राचार्यांना तातडीने निलंबित करण्यात यावे. आणि प्राचार्य व संबंधित ठेकेदारांवरती तातडीने गुन्हा दाखल करावा अशी आग्रही मागणी ह्यूमन राईट असोसिएशन फॉर प्रोटेक्शन,सिंधुदुर्ग या संघटनेच्या वतीने लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी किशोर तावडे यांची आज भेट घेऊन केली आहे. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षकांकडून मारझोड करण्यात येते तसेच संडास बाथरूमच्या साफसफाईसाठी कर्मचारी नेमण्यात आले नसून ती साफसफाई विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात येत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना जेवणासाठी वापरण्यात येणारे अन्नधान्य निकृष्ट दर्जाचे असते. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत देखील हेळसांड असून पुरेशी स्वच्छता ठेवली जात नाही. विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाच्या खिडक्या व दरवाजे मोडकळीस आलेले आहेत. त्यामुळे त्यामधून रात्रीच्या वेळी सरपटणारे प्राणी जाऊन विद्यार्थ्यांना दंश करण्याचा संभव आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या खोल्यांमध्ये पंखे व विद्युत वाहक उपकरणे खराब झालेली आहेत.अशा प्रकारच्या अनेक तक्रारी पालकांनी व विद्यार्थ्यांनी संघटनेकडे केलेल्या आहेत. विद्यालयाच्या प्राचार्यांनी या सर्व



गोष्टीची वेळीच गंभीर दखल घेतली नसल्याने ही घटना घडली आहे. यापूर्वी संघटनेच्या वतीने प्राचार्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या गोष्टींकडे लक्ष वेधले होते. तरी देखील लक्ष देण्यात आले नव्हते.

या सर्व गोष्टींना प्राचार्यांचा बेजबाबदारपणा सर्वस्वी जबाबदार आहे. तरी संबंधित प्राचार्यावरती पहिला गुन्हा दाखल करून त्याचे पहिले निलंबन करण्यात यावे तसेच जेवण व्यवस्था पाहणाऱ्या संबधित ठेकेदार आणि प्राचार्य या दोघांवरती गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी आग्रही भूमिका ह्यूमन राईट असोसिएशन फॉर प्रोटेक्शन, सिंधुदुर्ग या संघटनेच्या वतीने लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी किशोर तावडे यांची आज भेट घेऊन केली आहे. याबाबतच्या सदर निवेदनाच्या लेखी प्रत पालकमंत्री रविंद्र चव्हाण, शिक्षणमंत्री दिपक केसरकर, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा समाजकल्याण अधिक्षक, जिल्हा शिक्षणाधिकारी, तहसीलदार- सावंतवाडी, पोलीस निरीक्षक- सावंतवाडी यांना देखील प्रत देण्यात आली आहेत.

याबाबतचे निवेदन देतांना कोकण विभागीय अध्यक्ष संतोष नाईक जिल्हा सचिव अर्जुन परब, देवगड तालुका सदस्य राज खडपे, जिल्हा महिला संघटक सौ.शिवानी पाटकर, सावंतवाडी तालुका सचिव ॲड.संदीप चांदेकर, सदस्य सौ.मेघना साळगांवकर, कृष्णा गवस, कोकण विभाग रिक्षा टॅक्सी महासंघाचे सहसचिव सुधीर पराडकर, सांगेली नवोदय विद्यालयाचे पि.टी.सी. सभासद लक्ष्मण कदम आदी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बिडवाडी मांगरवाडी येथील जंगले कुटुंबाचे राहते घर आगीच्या भक्ष्यस्थानी

**कणकवली । प्रतिनिधी**

कणकवली तालुक्यातील बिडवाडी मांगरवाडी येथील बाबू जंगले यांच्या राहत्या घरास आग लागून छप्परसह घरातील संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्या. यात ९ लाख ८४ हजार ५०० रुपयांचे झाले एकूण नुकसान झाले तर रोख रक्कम २ लाख रुपये आणि ३ लाख ८५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जळाले. सुदैवाने शेळ्या चरण्यास सोडलेल्या असल्याने शेळ्यांचे प्राण वाचले,घरासोबत गोठाही जळाला असल्याने फार मोठी हानी झाली आहे. रविवारी १० मार्च रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. या आगीत पेटती साडी बाबू यांच्या आईच्या पाठीवर पडून पाठ भाजली. त्यांना तात्काळ वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या दुर्घटनेत बाबू जंगले यांचे अतोनात नुकसान झाले. उन्हाळ्याच्या झळा कमी व्हाव्यात म्हणून जंगले यांनी घराच्या छप्परावर गवत पसरून ठेवले होते. घरालगत लागलेल्या वनव्याची झळ जंगले यांच्या छप्परवर असलेल्या गवताला लागली. त्यात संपूर्ण छप्पर आणि



घरातील कपडे, संसारोपयोगी वस्तू बेचिराख झाल्या. या घटनेची माहिती शिवसेना शाखाप्रमुख अनिकेत राणे यांनी जिल्हाप्रमुख संजय आग्रे, तालुकाप्रमुख भूषण परुळेकर याना दिली. आग्रे व परुळेकर यांनी सदर घटना किरण सामंत यांच्या कानावर घालताच तातडीची मदत म्हणून किरण सामंत यांनी रोख दहा हजार रुपये जंगले कुटुंबियांना दिले.

शिवसेना तालुकाप्रमुख भूषण परुळेकर यांनी ही रक्कम जंगले याना सुपूर्त केली. यावेळी उपजिल्हाप्रमुख हरेश पाटील, युवासेना तालुका प्रमुख निलेश तेली, बिडवाडी उपसरपंच सुदाम तेली, दीपक दळवी, अनिकेत राणे, रविकांत राणे, धनाजी लाड, पोलीस पाटील नामदेव राणे, प्रकाश लाड, रामचंद्र आलव आदी उपस्थित होते.

### जोरदार वाऱ्यांमुळे मासेमारी आणि सागरी पर्यटनावर परिणाम

**मालवण । वार्ताहर**

महाशिवरात्रीच्या कालावधीत कोकण किनारपट्टीवर वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यांमुळे मासेमारी व्यवसावर परिणाम झाला आहे. आवक घटल्याने मासळीच्या किंमतींही वाढल्या आहेत. जोरदार वाऱ्यांचा परिणाम किनारपट्टीवरील सागरी पर्यटनावरही झाला आहे. दरवर्षी महाशिवरात्रीच्या कालावधीत कोकण किनारपट्टीवर जोरदार वारे वाहतात. अशावेळी समुद्रात बोटी घेवून जाणे धोकादायक असते. असे मच्छिमार सांगतात.

बाजारात मासे दुर्मिळ येथील किनारपट्टीवर वावळ(हुक फिशिंग), गीलनेट, न्हय, रापण आणि ट्रॉलींग पद्धतीची मासेमारी मोठ्या प्रमाणावर चालते. या पद्धतीच्या मासेमारीतून सुरमई, पापलेट, बांगडे, गोबरा, तांबोशी, कोकरी, बोईट, सावंदाळा, टोकी, पेडवे, तारली, कोलंबी, कुर्ले, म्हाकुल, मोडुसा, काडय आदी मासे बाराजातून दुर्मिळ झाले आहेत. जाळीत मासेच मिळत नसल्याने बोटी किनाऱ्यावर उभ्या आहेत. वेगाच्या वाऱ्यांमुळे मासळी खोल समुद्राच्या दिशेने सरकली आहे.

# माध्य. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रगती योजनेचा लाभ मिळणार : शिवाजी खांडेकर

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील खासगी मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्र्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी सोमवारी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यासाठी ५३ कोटी ८६ लाख खर्चास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून आश्र्वासित प्रगती



योजनेच्या मागणीसाठी आंदोलन उभे करणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाच्या लढ्याला यश मिळाले आहे. अशी माहिती शिक्षकेतर महामंडळाचे राज्य सरकार्यवाह श्री शिवाजी खांडेकर यांनी दिली आहे. राज्यातील खासगी मान्यताप्राप्त शाळांमधील कर्मचाऱ्यांना आश्र्वासित प्रगती योजनेचा लागू करावी अशी मागणी गेली अनेक वर्ष शिक्षकेतर महामंडळाच्या माध्यमातून शासनाकडे करण्यात येत होती. त्यासाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा संघर्षाची भूमिका घेतली होती. सर्वच शिक्षक तसेच पदवीधर आमदार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शिक्षकेतर महामंडळाने अनेक आंदोलने केली होती. नुकत्याच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघटनांच्या महामंडळाच्या ५१व्या राज्यव्यापी अधिवेशनात देखील याच प्रश्नावर प्रामुख्याने विचार विनिमय करण्यात आला होता. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत अर्थमंत्री यांच्याशी बोलून प्रश्न मार्गी लावला जाईल,असे आश्वासन राज्याचे शालेय शिक्षणमंत्री ना.दीपक केसरकर यांनी याप्रसंगी शिक्षकेतर महामंडळास दिले होते.त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मागणी अखेर मार्गी लागली आहे. महामंडळाच्या या यशाबद्दल शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नेते राज्य सरकार्यवाह श्री शिवाजी खांडेकर यांनी आनंद व्यक्त करून सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री ना.दिपक केसरकर त्याचबरोबर राज्यातील सर्व शिक्षक व पदवीधर आमदार यांचे आभार मानले आहेत. राज्याचे शिक्षण आयुक्त तसेच शिक्षण संचालक यांनी देखील याबाबत अर्थ विभागासाठी आवश्यक असणारी माहिती गोळा करून तातडीने त्यांना दिली व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या या प्रलंबित प्रश्नांबाबत सातत्याने शिक्षण विभाग व अर्थ मंत्रालय यांच्याशी पाठपुरावा केला याबद्दल श्री खांडेकर यांनी शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक यांचे देखील विशेष आभार मानले आहेत.

लवकरच याबाबत शासन निर्णय जाहीर व त्यानंतर त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत महामंडळ प्रयत्नशील असल्याचे श्री खांडेकर यांनी सांगितले. दि.१/१/२०२४ रोजी सेवेत असलेल्या व या १/१/२०२४ पूर्वी २४ वर्ष पुर्ण झालेल्या कर्मचार्यांना याचा प्रत्यक्ष लाभ दि.१/१/२०२४ पासून मिळणार आहे. तसेच दि.१/१/२०२४ पूर्वी सेवा निवृत्त व मयत झालेल्या कर्मचार्यांना देखील याचा लाभ मिळाला पाहिजे यासाठी राज्य शिक्षकेतर महामंडळाचे पदाधिकारी कटिबद्ध आहेत असे देखील श्री खांडेकर यांनी सांगितले.

# नारीशक्ती समाज घडवू शकते ! -झेलमताई ईनामदार



स्वराज महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त छत्रपती पुरस्कार विजेत्या सौ.झेलमताई इनामदार यांचा गौरव करताना माजी नगरसेवक, ॲड. कृष्णकुमार कोळी सोबत ज्येष्ठ समाज सेवक कृष्णाजी साळेकर

**ठाणे । विश्वनाथ पंडित**

समाधान, समृद्धी हवी असेल तर नारीशक्ती महत्त्वाची असून नारीशक्ती समाज घडवू शकते असे मत छत्रपती पुरस्कार विजेत्या सौ झेलमताई ईनामदार यांनी व्यक्त केले. आपल्या भाषणात स्त्रियांनी आरोग्याची काळजी, खेळाचे महत्व, सामाजिक जबाबदारी यावर त्यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन करून नारीशक्तीचे समाजाला योगदान हवे असे सांगून आयोजकांना त्यांनी उत्कृष्ट उपक्रमाबद्दल धन्यवाद दिले. ठाणे पूर्व येथील स्वराज महिला मंडळा तर्फे जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी समाजात विधेयक उपक्रम राबविणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. माजी नगरसेवक ड कृष्णकुमार कोळी, चित्रकार महेश कोळी, ज्येष्ठ समाज सेवक कृष्णाजी साळवेकर, सुवर्णा चव्हाण आदी मान्यवरांनी आवर्जून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. थोरा मोठ्यांकडून कौतुकाची थाप पाठीवर पडली की उत्साह वाढतो, ऊर्जा प्राप्त होते, समाधान मिळते अशा शब्दात महिला मंडळाच्या अध्यक्षा सविताताई चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती शिवाय मंडळाने उत्कृष्ट उपक्रम राबविल्याबद्दल उपस्थित पाहुणे आणि महिलांनी समाधान व्यक्त केले. संस्थेचे संस्थापक, सामाजिक कार्यकर्ते मनोहर चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# रेशन दुकानातून मिळाल्या फाटक्या साड्या; संतप्त नागरिकांकडून साडी, पिशव्यांची होळी

**मुंबई । प्रतिनिधी**

स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत प्रत्येक अंत्योदय लाभार्थी महिलांना साड्यांचे वाटप करण्यात येत आहे. मात्र,या साड्या फाटक्या आणि निकृष्ट दर्जाच्या असल्याचा आरोप महिलांनी केला आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात घोषणा केल्यानंतर राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना रेशन दुकानातून आनंदाचा शिधासोबत साडी देण्यात येत आहे. मात्र या साड्या जुन्या वापरलेल्या तसेच फाटक्या असल्याचा आरोप केला जात आहे. परभणी तसेच यवतमाळ जिल्ह्यातून फाटक्या साड्या दिल्याच्या तक्रारी आल्या आहेत.

गेल्या चार दिवसांपासून स्वस्त धान्य दुकानदारांमार्फत प्रत्येक अंत्योदय लाभार्थी महिलांना साड्यांचे वाटप करण्यात येत आहे. मात्र, या साड्या फाटक्या आणि निकृष्ट दर्जाच्या असल्याचा आरोप करत महिलांनी ही गरीबांची थट्टा असल्याचे म्हटले आहे. सरकारकडून रेशन दुकानामार्फत दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील महिलांना



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो असलेल्या पिशव्यांमधून साडी आणि मोफत धान्य देण्यात येत आहे. मात्र फाटक्या साड्या दिल्याचा आरोप करत परभणीतील पाथरी तालुक्यातील कान्सुर गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासमोर या साड्याची तसेच पिशव्याची होळी करण्यात आली.

पिशव्यांवर पंतप्रधान मोदींचा फोटो मोठा आणि भारत सरकारचा लोगो लहान छापण्यात आला आहे. राज्याच्या वस्त्रोद्योग संचालनालयाने राज्यातील अंत्योदय रेशन कार्डधारकांना साडी वाटपाचा निर्णय घेतला होता. दारिद्य रेषेखालील महिलांना वर्षातून एकदा साडी वाटप करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्य यंत्रमाग महामंडळ ही योजना राबवत आहे. या योजनेसाठी राज्य सरकार महामंडळाला साड्यांचे उत्पादन, जाहिरात, वाहतूक खर्च, साठवणूक, हमालीसाठी खर्च देणार आहे. तर २०२३-२४ या वर्षाकरिता महामंडळास एका साडीसाठी ३५५ रुपये दिले आहेत.

या योजनेची सुरुवात यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात ८६ रेशन दुकानांतून करण्यात आली. यात अंत्योदय योजनेच्या सात हजार ३४२ लाभार्थ्यांना साड्यांचे वाटप करण्यात येत आहे. मात्र, यात अनेक साड्या फाटक्या व जीर्ण अवस्थेत आहेत. अगदी टाकाऊ स्वरूपाच्या या साड्या आहेत,हीच का मोदींची गॅरंटी असा सवाल या महिला करत आहेत. त्यामुळे महिला रास्त दुकानातून साडी घेताना दुकानदाराशी वाद घालून साडी घेण्यास नकार देत आहेत. प्रशासन आणि जनता यामध्ये रास्त दुकानदार अडचणीत सापडला आहे.

### सिंधुरत्न फाउंडेशनच्या वतीने कणकवलीत महिलांचा सत्कार

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे जागतिक महिला दिनाचे औत्सुक्य साधून लावण्यसिंधू लोककला व चित्रपट सहकारी संस्था आणि सिंधुरन फाउंडेशन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या मंगळवार दिनांक १२ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता तेलीआळी, कणकवली येथील श्री भवानी सभागृह येथे महिला दिन साजरा करण्यात येणार आहे. तरी सदरील कार्यक्रमा स जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन लावण्यसिंधूचे अध्यक्ष श्री. बंद्रशेखर उपरकर व संचालिका सौ. प्रांजल पराडकर, सिंधुरल फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. अक्षता कांबळी यांनी केले आहे. ८ मार्चच्या जागतिक महिला दिनानिमित्त यावेळी महिलांसाठी विशेष योगदान देणाऱ्या सामाजिक क्षेत्रातील महिलांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे

### वागदे येथे स्मशान शेड च्या कामाचा शुभारंभ

**कणकवली । वार्ताहर**




कणकवली तालुक्यातील वागदे सावरवाडी येथे २५:१५ या निधीअंतर्गत स्मशान शेड च्या कामाचा शुभारंभ शिवसेना तालुका प्रमुख भूषण परुळेकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सरपंच संदिप सावंत, शिवसेना कळसुली विभागप्रमुख दिलीप घाडीगांवकर, श्रीधर गावकर, गोविंद घाडीगांवकर, लक्ष्मण घाडीगांवकर, भाई काणेकर, सुरेश घाडीगांवकर, भाई घाडीगांवकर, महादेव घाडीगांवकर, राजु काणेकर बाबी म्हापसेकर, सतिश घाडीगांवकर, अंकित घाडीगांवकर, लखन घाडीगांवकर व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# सिंधुदुर्गातील कलाकारांनी कथक, भरतनाट्यम, पखवाज जुगलबंदीने दक्षिण प्रांतात रोवला कलेचा झेंडा

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

कर्नाटक प्रांतात श्री क्षेत्र मुरुडेश्वर येथे महाशिवरात्री निमित्त गायन वादन नृत्य रंगले आणि सिंधुदुर्गातील कलाकारांनी कथक, भरतनाट्यम, पखवाज जुगलबंदीने दक्षिण प्रांतातही आपल्या कलेचे झेंडे रोवले.श्री जगन्नाथ संगीत विद्यालय पखवाज अलंकार श्री महेश सावंत आणि नुपूर कला केंद्र सौ.अनुजा गांधी मॅडम आणि सिद्धाई डान्स अकॅडमी सौ.कविता राऊळ - शेट्ये मॅडम यांनी संयुक्तपणे आपल्या शिष्यवर्ग कलाकारांसह दक्षिणेत सुद्धा आपल्या संगीत कलेचा झेंडा रोवला, महाशिवरात्री उत्सव पुराण प्रसिद्ध क्षेत्र तसेच पर्यटन स्थळ श्री मुरुडेश्वर येथे भक्तिमय जागरण रात्र उत्सवात अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते सिंधुदुर्गातील कलाकारांनी आपली कला सादर करुन भगवान शंकराला संगीत कलेच्या नटेशाला आपल्या कलेने प्रसन्न करुन तेथील उपस्थित संगीत रसिकांची मने जिंकली

पखवाज अलंकार महेश सावंत यांच्या मार्गदर्शनात पखवाज विशारद दत्तप्रसाद खडपकर, सचिन कातवणकर यांच्यासह श्री जगन्नाथ संगीत विद्यालयाच्या ७५ पखवाज वादक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच कथक नुपूर कला केंद्राच्या विशारदा



सौ.अनुजा गांधी मॅडम यांनी आपल्या ११ कथक विद्यार्थिनी समवेत सहभाग घेतला तसेच सिद्धाई डान्स अकॅडमी च्या नृत्य प्रशिक्षिका सौ.कविता राऊळ - शेट्ये मॅडम यांनी आपल्या ११ विद्यार्थिनी समवेत सहभाग घेतला याकरिता गायक/हार्मोनियम वादक म्हणून श्री अमित उमळकर यांनी धुरा सांभाळली तसेच गायक प्रफुल्ल रेवंडकर आणि धनश्री मेस्त्री व काशिष खडपकर यांनीही आपल्या गायन शैलीने रसिकांची मने जिंकली, तबला विशारद श्री अतुल उमळकर, साईश उमळकर, विनायक जोशी यांनी केले,ढोलकी वादन ओंमकार वेंगुर्लेकर, श्रीपाद पडोसकर, वेदांत मांजरेकर, विनय तिवरेकर, तुषार गोसावी,रुपेश माडये यांनी केले तर तालरक्षक म्हणून मनोहर वालावलकर व नारायण सावंत यांनी काम पाहिले मुरुडेश्वर देवस्थान चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री मंजुनाथ शेट्टी साहेब यांनी या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले तसेच श्री उमेश मेस्ता, कुमार मेस्ता, गायक नरसिंहा (कर्नाटका )यांचे बहुमोल सहकार्य लाभले, श्री जगन्नाथ संगीत विद्यालयाचे संचालक डॉ.श्री दादा परब व बुवा भजनसम्राट श्री भालचंद्र केळुसकर यांनीही या कार्यक्रमाचे कौतुक केले आहे यापुढेही आपल्या कोकणच्या संगीत कलेचे नाव प्रचार प्रसार करुन भविष्यात अजूनही असे संगीत दौरे करुन खूप मोठे उंचावू असे उदगार पखवाज अलंकार महेश सावंत यांनी यावेळी काढले.